रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १९४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शनिवार, ३१ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

शेकापचा रेवदंड्यातील ४० वर्षांचा बालेकिल्ला ढासळला/२
जंजिरा मुक्ती संग्राम दिन आज होणार साजरा/५
उत्तम माने यांनी राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा गाजवली/८

## राष्ट्रवादीच्या निर्णयाला आमचे समर्थन असेल –मुख्यमंत्री



**मुंबई** : राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे नाव उपमुख्यमंत्रिपदासाठी समोर आले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रतिक्रिया देताना म्हणाले, अजितदादांचे कुटुंब असेल की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल त्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत. त्यांचे जे काही निर्णय होतील त्यांना आमचे समर्थन असेल. राष्ट्रवादीच्या निर्णयाला भाजप पक्ष आणि सरकारचा पूर्ण पाठिंबा असेल. राष्ट्रवादीचे नेते माझ्याशी दोन वेळा ते चर्चा करून गेले आहेत. या चर्चेत त्यांनी त्यांची काय कार्यपद्धती आहे? काय-काय ऑप्शन्स आहेत? या संदर्भात चर्चा केली आहे, मात्र अंतिम निर्णय जो काही असेल त्याचा निर्णय तो पक्ष घेईल. त्या संदर्भात मी बोलणे योग्य होणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

# अजितदादांचा उत्तराधिकारी ठरणार

## राष्ट्रवादीच्या आमदारांची आज महत्त्वपूर्ण बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गुरुवारी अंत्यसंस्कार झाल्यानंतर पुढील वाटचालीसंदर्भात चर्चा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीनंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधला. दरम्यान, राष्ट्रवादीच्या आमदारांची शनिवारी (दि.३१) मुंबईत महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे.

या संदर्भात बोलताना राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, अजितदादांच्या जाण्याने पक्षात आणि सरकारमध्ये मोठी पोकळी निर्माण झालीय हे सत्य आहे, पण 'शो मस्ट गो ऑन' या उक्तीप्रमाणे आपल्याला पुढे जावेच



लागेल. कोणाला तरी ही जबाबदारी स्वीकारावी लागेल. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळावी अशी पक्षात मोठी लाट आहे आणि ही मागणी मुळीच चुकीची नाही. अजितदादांच्या अनुपस्थितीत सुनेत्रा पवारांच्या रूपाने हे महत्त्वाचे पद भरता येईल याकडे सध्या पक्षाचे लक्ष केंद्रित आहे. पक्षाचे अध्यक्षपद आणि विधीमंडळ नेतेपद कोणाकडे द्यायचे याचा अंतिम निर्णय घेण्यासाठी मुंबईत सर्व आमदारांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत जे ठरेल, त्यानुसार सत्तेचा पुढील गाडा हाकला जाईल.

प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले की, अजित पवारांकडे जी जागा होती, त्या जागेबद्दल निर्णय करावा लागणार आहे. यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आमच्या पक्षाच्या सर्व आमदारांनाही बोलावून त्यांच्याशी चर्चा करून तसेच जनभावनेचा आदर राखून आम्हाला निर्णय घ्यायचा आहे.

सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री बनवले जाणार का? या प्रश्नावर बोलताना पटेल म्हणाले की, कोणाला त्या जागेवर बसवाचे हा पक्षाचा निर्णय आहे. आम्ही जनभावनेचा आदर करून आमदारांचे मत विचारात घेणार आहोत. आमची स्वतःचीसुद्धा भावना आहेच. अजूनही राजकीय शोक आहे, घरी काही धार्मिक विधी सुरू आहेत. आम्हाला याबाबत सुनेत्रा वहिनींशीही बोलावे लागेल, पार्थ पवार, जय पवार यांच्याशीही बोलावे लागेल. लवकरात लवकर ही जागा आम्हाला भरायची आहे.

खासदार सुनील तटकरे यांनीही कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सुनेत्रा पवार आणि पवार परिवाराला विश्वासात घेतले जाईल. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतरच पक्ष आपला अंतिम निर्णय जाहीर करेल, असे स्पष्ट केले.



### स्व. अजितदादांना श्रद्धांजली

**बारामती : महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कणखर नेतृत्व, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाले आणि झंझावाती पर्व निमाले. या दुःखदप्रसंगी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी पवार कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली तसेच अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.**

### पनवेलच्या उसर्लीत लाडक्या बहिणींचा मेळावा

# केंद्र आणि राज्य सरकार महिलांच्या हितासाठी समर्पित

■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र आणि राज्यातील महायुती सरकार पूर्णपणे सर्वसामान्यांच्या आणि महिलांच्या हितासाठी समर्पित आहे. सध्या सुरू असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून येणाऱ्या काळातही ती सुरू राहणार आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी उसर्ली खुर्द येथे लाडक्या बहिणींच्या मेळाव्यात केले.

पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्दमधील सुख-शांतीनगर येथे लाडकी बहीण मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित महिलांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देत ७ फेब्रुवारीला होणाऱ्या मतदानावेळी कमळ निशाणीसमोरील बटन दाबून पळस्पे जिल्हा परिषद



गटाच्या उमेदवार हर्षदा घरत आणि पंचायत समिती गणाचे उमेदवार राजेंद्र पाटील यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

या मेळाव्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद उमेदवार हर्षदा घरत, पंचायत समिती उमेदवार राजेंद्र पाटील, ऐश्वर्या जाधव, प्रतिभा जाधव, अमृता माळी, प्रणया पाटील, आरती गावणांग, अश्विनी पवार, संस्कृती चाळके, सुप्रिया जाधव, अनुजा आलोजी, रोहिणी पिसाळ, सुनिता दळवी, वर्षा पाटील, निकिता कोळी, रामेश्वरी नरूटे, रोहिणी मोरे, रेश्मा माळवे, भाग्यश्री खाटपे, प्रणाली कुलपे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या. भाजप-महायुतीचे सरकार महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी कटिबद्ध असून विकासकामांचा हा वेग कायम राखण्यासाठी भाजपच्या उमेदवारांना पाठबळ देणे आवश्यक आहे, असे आवाहन आमदार ठाकूर यांनी केले.

या वेळी महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि खेळ घेण्यात आले होते, ज्याला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## निवडक

### विमानाच्या अपहरणाची धमकी; अहमदाबादमध्ये इमर्जन्सी लँडिंग

**नवी दिल्ली** : कुवेतहून दिल्लीला येणाऱ्या इंडिगो कंपनीच्या एका विमानाला अपहरण करण्याची धमकी मिळाली. त्यामुळे शुक्रवारी (दि.३०) दुपारी या विमानाचे अहमदाबादमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. टिश्यू पेपरवर लिहिलेल्या चिठ्ठीत विमानाचे अपहरण करून बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती, मात्र तपासणीअंती काहीही संशयास्पद आढळले नाही.

### कॉन्फिडन्ट ग्रुपचे मालक सीजे रॉय यांची आत्महत्या

**बंगळुरू** : रिअल इस्टेट आणि इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील अग्रणी कंपनी कॉन्फिडन्ट ग्रुपचे संस्थापक आणि मालक सीजे रॉय यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बंगळुरूमधील कार्यालयात त्यांनी स्वतःवर गोळी झाडून आयुष्य संपवले. प्राथमिक माहितीनुसार आयकर तपासामुळे रॉय मानसिक तणावाखाली होते. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

# रायगडात ११८४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

### १८ जण तडीपार; मतदानापूर्वी पोलीस ॲक्शन मोडवर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलिसांकडून समाजकंटकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. जिल्ह्यात एक हजार १८४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून १८ जणांना जिल्ह्यातून तडीपार, तर एमपीडीए कायद्यांतर्गत एका व्यक्तीवर कारवाई केली आहे.

जिल्हा परिषदेच्या ५९ गट तसेच पंचायत समितीच्या ११८ गणांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कालावधीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने व्यापक उपाययोजना सुरू केल्या आहेत.

ज्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत, विशेषत: निवडणुकीत काळात गोंधळ घातल्याप्रकरणी ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत अशा सर्व समाजकंटकांविरोधात पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया केली आहे. त्याचप्रमाणे गुंड प्रवृत्तीच्या लोकांवरही तडीपारीची कारवाई करण्यात येत आहे. रायगड पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रात आतापर्यंत ११८४ जणांवर प्रतिबंधात्मक, १८ जणांवर तडीपारीची आणि एकावर एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

निवडणूक काळात पोलीस प्रशासनाकडे शस्त्रे जमा केली जातात. जिल्हा परिषद निवडणूक जाहीर झाली असल्याने आपल्याकडील शस्त्र जमा करण्यासाठी सर्वांना आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार १४२९ जणांनी आपली शस्त्रे पोलिसांकडे जमा केली आहेत, अशी माहिती रायगड पोलीस दलाकडून देण्यात आली.

एकंदर राजकीय पक्ष निवडणुकीचा जोरदार प्रचार करीत असताना पोलिसांनीही आपली तयारी करून कारवाई चालू केली आहे.

# गव्हाण विभागात भाजप महायुतीचा झंझावात

■ उमेदवारांचा घरोघरी प्रचार, मतदारांशी थेट संवाद

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गव्हाण जिल्हा परिषद गट तसेच वहाळ व गव्हाण पंचायत समिती गणामध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. महायुतीच्या उमेदवारांनी शुक्रवारी (दि. ३०) घरोघरी भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली गव्हाण जिल्हा परिषद गट तसेच वहाळ व गव्हाण पंचायत समिती गणामध्ये भाजप महायुतीचे उमेदवार जोमाने प्रचार करत असून विजयासाठी सज्ज झाले आहेत. अनुभवी



आणि विकासाभिमुख नेतृत्वामुळे प्रचाराला मोठ्या प्रमाणावर जनसमर्थन मिळत आहे.

या प्रचार मोहिमेत भाजप नेते रविशेठ पाटील, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका प्रतिभा भोईर, कोळी समाजाचे नेते उत्तम कोळी, शैलेश भगत, निलेश खारकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचारादरम्यान उमेदवार निकिता खारकर यांनी सांगितले की, विकासकामांच्या जोरावर आम्ही मतदारांसमोर जात आहोत. मिळणारा प्रतिसाद पाहता आमचा विजय निश्चित आहे, असा विश्वास वाटतो, तर वितेश म्हात्रे म्हणाले की, आमदार महेश बालदी यांनी केलेली विकासकामे आम्ही जनतेपर्यंत पोहचवत असून घराघरात जाऊन लोकांशी थेट संवाद साधत आहोत. आम्ही केलेल्या कामांवर मतदार समाधानी आहेत. त्यामुळे विरोधकांकडे आता आरोप करण्याशिवाय काही उरलेले नाही.

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते स्व. जनार्दन भगत, लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, वाय.टी. देशमुख यांची जन्मभूमी असलेल्या गव्हाण विभागाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम या नेतृत्वाने गेल्या अनेक वर्षांत केले आहे. नागरिकांचे प्रश्न सातत्याने सोडविणे, लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि कोणत्याही भेदभावाविना मदतीचा हात देणे ही या नेतृत्वाची ओळख आहे.

सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सहकाऱ्यांनी कायम लोकाभिमुख कार्यपद्धती अवलंबली आहे. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मदत करणे हा त्यांचा स्थायीभाव राहिला असून यामुळेच त्यांना नेहमीच जनतेचा भरघोस पाठिंबा लाभला आहे. **(पान २ वर..)**

# कल्याण डोंबिवलीचे कारभारी ठरले!

### महायुतीच्या महापौर-उपमहापौर उमेदवारांचे अर्ज दाखल



**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवलीच्या महापौर कोण होणार हे आता स्पष्ट झाले आहे. महापौरपदासाठी शुक्रवारी (दि. ३०) शिवसेना शिंदे गटाच्या हर्षाली थवील-चौधरी यांनी अर्ज भरला, तर उपमहापौर पदासाठी भाजपाचे राहुल दामले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत मनसेने महायुतीला पाठिंबा दिल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मनसेचे नेते माजी आमदार राजू पाटील, शिवसेना आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, भाजप जिल्हाध्यक्ष नंदू परब आदी नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी खासदार शिंदे यांनी बोलताना सांगितले की, शिवसेना आणि भाजपची ताकद आधीच मोठी होती. त्यात मनसेप्रमुख राज ठाकरे आणि आमदार राजू पाटील यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे महायुतीची शक्ती अधिक वाढली आहे. मनसेची साथ मिळाल्याने ही निवडणूक केवळ औपचारिकता असून महायुतीचे दोन्ही उमेदवार बिनविरोध निवडून येतील.

### अकोल्याच्या महापौरपदी भाजपच्या खेडकर



**अकोला** : भाजपने अचूक राजकीय कूटनीतीच्या जोरावर अकोला महापालिकेत आपली सत्ता प्रस्थापित केली आहे. महापौर व उपमहापौरपदासाठी शुक्रवारी (दि. ३०) झालेल्या निवडणुकीत भाजपच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी विजय मिळवला, तर उपमहापौरपदी अमोल गोगे यांची निवड झाली.

अकोला शहरातील प्रभाग क्रमांक १५च्या भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका असलेल्या शारदा खेडकर यांनी महापौरपद निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार सुरेखा काळे यांचा ४५ विरुद्ध ३२ मतांनी पराभव केला होता. खेडकर यांना मिळालेल्या ४५ मतांमध्ये भाजपचे ३८ नगरसेवक, शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन, अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचा एक, शिंदे गटाच्या शिवसेनेचा एक तसेच दोन अपक्ष नगरसेवकांचा समावेश होता. विरोधकांचे सर्व अंदाज फोल ठरले आहेत. बहुमताचा स्पष्ट आकडा नसतानाही भाजपने मित्र पक्ष आणि अपक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन करत आपली ताकद दाखवून दिलीय.

# रसायनी विभागात शेकापला झटका

### देवळोलीच्या सरपंच राजेश्री पाटील समर्थकांसह भाजपमध्ये



**रसायनी : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील देवळोली ग्रामपंचायतीच्या सरपंच राजेश्री पाटील तसेच राजेश पाटील यांनी अनेक समर्थकांसह शुक्रवारी (दि. ३०) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी आणि पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते पाटील यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. या प्रवेशामुळे रसायनी विभागात शेकापला झटका बसला आहे.

या कार्यक्रमास नगरसेविका प्रिती जॉर्ज, माजी पंचायत समिती सदस्य जगदिश पवार, जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, हभप अनंतबुवा पाटील, संदीप पाटील, रोहिदास पाटील, सुनील माळी, संदीपा माळी, योगेश पाटील, उमेश पाटील, आदित्य गाताडे आदी उपस्थित होते.

सरपंच व समर्थकांच्या प्रवेशामुळे वावेघर जि.परिषद उमेदवार अनन्या गाताडे आणि पोयंजे पंचायत समितीच्या उमेदवार अस्मिता पाटील यांना संघटनात्मक फायदा होणार आहे.

# शेकापचा रेवदंड्यातील ४० वर्षांचा बालेकिल्ला ढासळला

## ग्रामपंचायत सदस्य जयश्री पाटील यांच्यासह मोठा कोळीवाडा ग्रामस्थ शिवसेनेत दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा मोठा कोळीवाडयातील ग्रा.प.सदस्या जयश्री पाटीलसह मोठया संख्येने ग्रामस्थ तसेच महिलांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केल्याने, रेवदंडा शेकापक्षाला ४० वर्षाचा पांठिबा असलेला मोठा कोळीवाडयाचे रूपाने बुरूज ढासलला असून पुनस्यःरेवदंडा शेकापक्षास शिवसेनेने सुरूंग लावून खिंडार पाडले. रेवदंडा मोठा कोळीवाडा येथील खंडोबा मंदिरातील सभागृहात पालखी उत्सवाच्या पुर्वसंध्येला मोठया संख्येने ग्रामस्थ व महिला यांचा शिवसेना पक्षात पक्ष प्रवेश कार्यक्रम गुरूवार दि. २९ जानेवारी रोजी झाला. यावेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती.



शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषद गट उमेदवार डॉ.सचिन राउळ, पंचायत समिती गण उमेदवार शरद गोंधळी, तसेच रेवदंडा ग्रा.प.सरपंच प्रफुल्ल मोरे, अजीत पाटील, बोर्ली ग्रा.प.सरपंच सपना जायपाटील, तसेच ग्रामपंचायत रेवदंडा सदस्य सुराराम माळी,हर्षल घरत,योगेश पिटनाईक,राकेश मानाजी, दुशांत झावरे, भारती मोरे,जोऐल उंदीर, संकेत भाटकर, सदस्या लिना मानकर, शलाका राउत, तनुजा मोरे, भुषण मोरे,ताराचंद कोंडे, रोशन भोईर,किशोर मानकर, सुभाष शेळके, केदार खोत तसेच रेवदंडा ग्रा.प.सदस्य व सदस्या यांचेसह मोठया संख्येने शिवसेनेचे कार्यकर्त्याची उपस्थिती होती.

आमदार महेंद्र दळवी यांनी ग्रा.प.सदस्या जयश्री पाटील, अजीत पाटील यांचे तसेच शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून शिवसेना पक्षात स्वागत केले. यावेळी मोठा कोळीवाडा येथील विठोबा बनिया, चित्रा बनिया, ताराबाई पाटील, गाव पाटील महेश पाटील, सुचिता पाटील, जनीबाई मायपाटील, सचिन पाटील, स्वप्नाली पाटील, चंद्रा पाटील, भरत पाटील, रंजिता पाटील, केतन उंदीर, बिपीन बनिया, मित बनिया, लक्ष्मी पाटील, वेदांत पाटील, उदय पाटील, सुनिता पाटील, शांताबाई बोबडी, विजेता बनिया, पारू बंगळेकर, गणेश बंगळेकर, कविता बनिया, अशोक बनिया, संनिल बनिया, मिनाक्षी बनिया, संतोष गुंडा, शिल्पा गुंडा, आनंद पाटील, रविंद्र बनिया, विजेता बनिया, परशुराम बोबडी, प्रणव बोबडी, प्रमोदिनी बोबडी, आशा रागा, दत्ता रागा, प्रतिभा रागा, बाळकृष्ण रागा आदीचे स्वागत आमदार महेंद्र दळवी यांनी शिवसेना पक्षात भगवी शाल, व पुष्पगूच्छ प्रदान करून केले.

रेवदंडा विभागात शिवसेना पक्षाची घौडदौड चांगली होत असून, पक्ष प्रवेश घेतलेल्या सर्व कार्यकर्त्याचा हिरमोड होणार नाही, यांची ग्वाही आमदार महेंद्र दळवी यांनी दिली. यावेळी त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषद गट उमेदवार डॉ.सचिन राउळ, पंचायत समिती उमेदवार शरद गोंधळी यांना बहूमताने निवडून देण्याचे आवाहन केले.

# लोहारे जि.प.गटातील लढत मागील वेळेचीच; पण चिन्हे बदलली!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गालगतचा जिल्हा परिषद गट असलेल्या लोहारे ५९ जि.प.गटात मागील वेळेचीच उमेदवारांची लढत होणार असून शिवसेनेचे चंद्रकांत कळंबे यांचे निवडणूक चिन्ह पूर्वीचेच धनुष्यबाण आहे. मात्र, मागील वेळी काँग्रेसचे उमेदवार असलेल्या कृष्णा कदम हे कमळ चिन्हावर उमेदवारी लढवित आहेत. त्यांच्या पूर्वीच्या हाताचा पंजा निवडणूक चिन्हावर अ.रझाक करबेलकर निवडणूक लढवित आहेत. यावेळी कृष्णा कदम नावाचे दुसरे उमेदवार अपक्ष असून त्यांचे निवडणूक चिन्ह ढोबळी मिरची आहे. हे चिन्ह जवळपास कमळ चिन्हासारखेच आहे. यामुळे शिवसेनेचे उमेदवार चंद्रकांत कळंबे यांना लोहारे ५९ जि.प.गटात दोन कृष्णा कदम यांचे आव्हान दिसून येत आहे.



पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी लोहारे ५९ जि.प.गटात लढतीचे चित्र दमदार असण्याची शक्यता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांनीही अर्ज दाखल केल्यामुळे निर्माण झाली होती. मात्र, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या दिवशी हे चित्र बदलले आणि अचानक मनसे आणि शिवसेना उबाठा पक्षाच्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेऊन भाजप राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा जाहिर केला. पण तत्पूर्वी, कॉग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस मार्गे भाजपची उमेदवारी स्विकारणाऱ्या कृष्णा कदम यांना राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती झाल्याने आधार मिळाला आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या लोहारे ५९ जि.प.गटातील लढत सलग सर्वसाधारण आरक्षण पडल्यामुळे मागील वेळेच्या उमेदवारांमध्येच होणार असून कृष्णा कदम नावाच्या दोन प्रतिस्पर्धी उमेदवारांनी रायगड जिल्हा परिषदेचे सलग तीन वेळा सदस्य झालेले चंद्रकांत कळंबे यांच्यासमोर आव्हान दिले आहे. मागील वेळी कृष्णा कदम यांचे निवडणूक चिन्ह असलेल्या हाताच्या पंजाचे निवडणूक चिन्ह या निवडणुकीत अ.रझाक करबेलकर असून हाताचा पंजा निवडणूक चिन्हावर मागीलवेळी पराभूत झालेले कृष्णा कदम कमळ चिन्हावर यंदा निवडणुकीत भवितव्य आजमावण्याचा प्रयत्न चालवला आहे.

# तळवली राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगासह तळवली परिसरात नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे, सर्वसामान्यांच्या हाकेला धावणारे कै.भानूदास माळकर यांच्या पुण्यस्मरणार्थ त्याचा लहान भाऊ मनोहर माळकर याने आपल्या जन्मदिनाचे औचित्य साधून कै.भानूदास माळकर यांच्या पुण्यस्मरणार्थ तळवली रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तरांचे वाटप केले. विद्यार्थ्यांना दप्तर मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. यावेळी मांडे, अतुल माळकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना न करणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागांतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:हून दाखल करून घेतलेली जनहित याचिकावर दिलेल्या आदेशानुसार शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर तात्काळ व प्रभावी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.



त्या अनुषंगाने, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये बांधकामाच्या ठिकाणी सुरु असलेल्या कामांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंग करीता अवलंबवायची 'मानक कार्यप्रणाली व बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषण दंडात्मक कारवाईबाबतची नियमावली मानक कार्यप्रणाली अन्वये दंडात्मक शुल्क भरणा करणेबाबत संबंधित विकासक / बांधकाम धारकांस कळविण्यात आलेले होते.

तसेच ध्वनी / वायू प्रदूषण नियंत्रणाकरीता आवश्यक उपाययोजना केल्याबाबत खातरजमा करूनच काम करण्यात यावे. तसेच बांधकाम स्थळच्या सभोवताली रस्त्यांवर धूळ प्रदूषण होऊ नये याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी अन्यथा सुरु असलेले बांधकाम त्वरित बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक विशेष मोहीम; ६५ हजार दंड वसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त सूचनांनुसार २२ ते २८ जानेवारी या कालावधीत एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक प्रतिबंधात्मक विशेष मोहीमा राबवून ६५ हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच १८ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

२२ जानेवारी २०२६ पासून सर्व विभाग कार्यालय क्षेत्रात प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक तपासणी मोहीम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे आणि परिमंडळ १ विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ विभागाचे उपआयुक्त संजय शिंदे यांच्या नियंत्रणाखाली प्रभावीपणे राबविण्यात आली.

यामध्ये बेलापूर विभागात दोन व्यावसायिकांकडून रु. १० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. नेरुळ विभागातही एका व्यावसायिकाकडून रु. ५ हजार दंडवसूली आणि २ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच वाशी विभागात एका व्यावसायिकाकडून ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांच्या साठ्याची जप्ती करण्यात आली. तुर्भे विभागात दोन व्यावसायिकांकडून रु. १० हजार दंडवसूली आणि ६ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्ती आणि कोपरखैरणे विभागात रु. ५ हजार दंड वसूली व १ कि.ग्रॅ प्लास्टिक पिशव्यांची जप्ती करण्यात आली. घणसोली विभाग कार्यालयामार्फत चार व्यावसायिकांकडून रु. २० हजार दंड वसूली आणि ७ कि.ग्रॅ प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच परिमंडळ २ च्या भरारी पथकामार्फत रु. १० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १.५ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांकडून पूर्णपणे टाळला जावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे औद्योगिक भेटीचे आयोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील राम शेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागाने शुक्रवार दिनांक ३० जानेवारी रोजी औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. सदर उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जांभूळपाडा खोपोली येथील करू कार्टून्स (आई) प्रा. लि. कंपनीला भेट दिली. या उपक्रमामध्ये एकूण ७६ विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांच्यासोबत ५ प्राध्यापक उपस्थित होते.

सकाळी ७.३० वाजता महाविद्यालयाच्या परिसरातून सर्व सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांचा गट रवाना झाला. या औद्योगिक भेटीचे नेतृत्व मॅनेजमेंट स्टडीज विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले यांनी केले तसेच त्यांच्यासोबत प्रा. शितल चव्हाण, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. अर्पिता नायक व प्रा. रेहनुमा खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रिया, उत्पादन व्यवस्थापन, कार्यपद्धती, संघटन रचना तसेच व्यावसायिक शिस्त यांची सखोल माहिती मिळाली. वर्गामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवस्थापन संकल्पनांचा प्रत्यक्ष उपयोग कसा केला जातो याचा अनुभव विद्यार्थ्यांना या भेटीतून मिळाला.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात लक्षणीय वाढ झाली असून त्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला आहे. या औद्योगिक भेटीनंतर आयोजित निसर्गभ्रमंतीमुळे विद्यार्थ्यांना निसर्गसौंदर्याचा आनंद घेता आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, परस्पर सहकार्य तसेच मानसिक ताजेपणा निर्माण झाला. या यशस्वी उपक्रमासाठी मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे महाविद्यालयाच्या आभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून भविष्यातही अशा शैक्षणिक व अनुभवसमृद्ध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे

# नवी मुंबई भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे प्रदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे बी.व्हॉक इंटीरियर डिझाईन विभागाच्या वतीने दिनांक २९ व ३० जानेवारी २०२६ रोजी भव्य शैक्षणिक व कलात्मक प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन संचालक मा. श्री. विलासराव कदम यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाला आर्किटेक्ट व प्राचार्य प्रा. सतीश ढाले प्रमुख उपस्थित होते.



या प्रदर्शनाचे संपूर्ण नियोजन, संकल्पना व यशस्वी अंमलबजावणी बी.व्हॉक इंटीरियर डिझाईन विभागप्रमुख प्रा. वृषाली दत्तात्रय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यावसायिक दिशा देणे, डिझाईन प्रक्रियेची सखोल समज निर्माण करणे तसेच प्रत्यक्ष सादरीकरणासाठी त्यांना प्रेरित करणे, यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे प्रदर्शनाला विशेष उंची प्राप्त झाली. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या स्टडी टूरवर आधारित विशेष 'स्टडी टूर एक्झिबिशन' सादर करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेटी, अभ्यास, निरीक्षणे व अनुभवांचे डिझाईन स्वरूपात सादरीकरण केले. तसेच इंटीरियर डिझाईनशी संबंधित विविध संकल्पनांवर आधारित मॉडेल्स, लेआउट्स, मटेरियल स्टडी, थीम आधारित डिझाईन्स व सादरीकरणे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या दोन दिवसांच्या प्रदर्शनाला १००० हून अधिक विद्यार्थी, पालक, डिझाईन व्यावसायिक व अभ्यागतांनी भेट दिली, ज्यामुळे प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मेहनत घेतली असून या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व व्यावसायिक दृष्टिकोन अधिक बळकट झाला आहे. कॉलेजच्या व्यवस्थापनाने अशा शैक्षणिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत विभागप्रमुख प्रा. वृषाली कांबळे, शिक्षक, विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पनवेल मनपातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी उपमुख्यमंत्र्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.



यावेळी अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे,लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे,सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत स्तब्ध उभे राहून आदरांजली अर्पण केली.

अत्यंत अभ्यासू व स्पष्ट वक्ते, शेतकऱ्यांचे प्रश्न जाणणारे, कायद्याचा अभ्यास असणारे अशी अजितदादा पवार यांची ख्याती होती. त्यांचा अपघात ही अत्यंत दुर्देवी घटना आहे, असे शेटे म्हणाले.

पान १ वरुन

## गव्हाण विभागात भाजप महायुतीचा झंझावात

या विश्वासार्ह आणि विकासाभिमुख नेतृत्वाचा लाभ भाजप महायुतीच्या उमेदवारांना निवडणुकीत निश्चितच होणार असून गव्हाण जिल्हा परिषदमध्ये निकिता खारकर, वहाळ पंचायत समितीमधून वितेश म्हात्रे आणि गव्हाण पंचायत समिती गणामध्ये जिज्ञासा कोळी या तीनही उमेदवारांचा अर्थात भाजप महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



# वडघर येथे पाणी फाउंडेशनतर्फे शेतकरी प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, माणगाव येथे 'पाणी फाउंडेशन'च्या वतीने आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात पार पडले. या प्रशिक्षणासाठी उरण तालुक्यातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पारंपारिक शेतीला व्यावसायिक जोड देऊन 'गट शेती'च्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवता येईल, याचे मोलाचे धडे यावेळी देण्यात आले.खेळांच्या माध्यमातून प्रशिक्षणाचा नवा पॅटर्न हे प्रशिक्षण शिबिर इतर शिबिरांपेक्षा वेगळे ठरले ते त्यातील शिकवण्याच्या पद्धतीमुळे. पाणी फाउंडेशनच्या प्रशिक्षकांनी कोरड्या व्याख्यानांऐवजी विविध खेळ आणि उपक्रमांच्या माध्यमातून गट शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांच्या मनावर बिंबवले. एकटा शेतकरी हतबल ठरू शकतो, पण संघटित गट शेतीमुळे बाजारपेठ काबीज करता येते, हा संदेश खेळांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आला.



### शेतकऱ्यांच्या भूमिकेवर विशेष भर

गट शेतीमध्ये प्रत्येक शेतकऱ्याची भूमिका (ठेश्रश) काय असावी, गटाचे नियोजन कसे करावे, खर्च कमी करून नफा कसा वाढवावा आणि एकमेकांवर विश्वास ठेवून सामूहिक प्रगती कशी साधावी, यावर प्रशिक्षणात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

### उरणच्या शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद

उरण भागातून आलेल्या शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणात अतिशय उत्साहाने सहभाग नोंदवला. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी अनेक शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, साने गुरुजी स्मारकाच्या पवित्र वातावरणात मिळालेले हे ज्ञान आमच्या आयुष्याला नवी दिशा देणारे ठरेल. आता आम्ही केवळ शेतकरी राहणार नाही, तर एक उद्योजक म्हणून काम करू. या यशस्वी आयोजनाबद्दल उरणच्या शेतकरी बांधवांनी पाणी फाउंडेशनच्या टीमचे आणि साने गुरुजी स्मारकाचे आभार मानले आहेत. या उपक्रमामुळे उरण परिसरातील शेती क्षेत्रात आता मोठ्या बदलाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक

# भाजप महायुतीची प्रचारात आघाडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सध्या शिगेला पोहोचली आहे. या निवडणूक प्रचारात भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मोठी आघाडी घेतल्याचे चित्र दिसत असून, केळवणे जिल्हापरिषद गटाचे उमेदवार मंगेश वाकडीकर आणि केळवणे पंचायत समिती गणाच्याउमेदवार शीतल माळी यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू आहे.



त्यानुसार भाजपचेराज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्याप्रमुख उपस्थितीत शुक्रवारी डोलघर येथे जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले.यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले की, भारतीय जनता पार्टीने केळवणे जिल्हापरिषद गटातून मंगेश वाकडीकर आणि पंचायत समिती गणातून शीतल माळीयांच्या रूपाने तरुण, सुशिक्षित आणि सक्षम नेतृत्व दिले आहे. हे उमेदवारतुमच्या सेवेसाठी पूर्णपणे सज्ज आहेत. आम्ही केवळ पोकळ आश्वासने देत नाही,तर प्रत्यक्षात कामे करून दाखवली आहेत, त्यामुळे ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्यामतदानादिवशी मकमळफ या चिन्हासमोरील बटन दाबून आपल्या उमेदवारांनाभरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन केले.

तसेच निवडणुकीत विरोधकांनाकधीही कमी लेखू नका. प्रत्येक कार्यकत्यारने गाफील न राहता घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधणे आवश्यक आहे अश्या सूचना दिल्या. या प्रचारावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, बाळूशेठ पाटील, केळवणे जिल्हापरिषद विभागीय अध्यक्ष विद्याधर जोशी यांच्यासह पदाधीकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# उरण विधानसभा मतदारसंघात भाजपमध्ये प्रवेशाचा ओघ सुरूच

**उरण : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजल्यापासून उरणविधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलू लागली आहेत.



उरणचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या विकासकामांवर विश्वास ठेवून विविध पक्षांतील कार्यकत्याचा भाजपमध्ये प्रवेशाचा ओघ सुरूच आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना उबाठाचे युवा अध्यक्ष हर्षद ठाकूर आणि ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष अनिल घरत यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला,

या पक्ष प्रवेशामुळे भाजपचे जासई जिल्हा परिषद गटाचे जे. डी.जोशी आणि जासई पंचायत समिती गणाच्या उमेदवार मनिषा बळीराम घरत यांच्या मतदानाचा टक्का अधिक वाढणार आहे.यावेळी हर्षद ठाकूर आणि अनिल घरत यांच्यासोबतच जयेश घरत, जयेंद्र घरत,अनिल घरत, यज्ञेश घरत, परेश घरत, चेतन घरत, सुरज गावंड, मयुरेश ठाकूर,सचिन कडू, भावेश ठाकूर, सिद्धार्थ घरत यांनी आमदार महेश बालदी यांचे नेतृत्व स्वीकारत भाजपचे कमळ हाती घेतले. आमदार बालदी यांनी सर्व प्रवेशकत्यारचेस्वागत करून त्यांना उरणच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

या वेळी उरणचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, उरण तालुका अध्यक्ष धनेश गावंड, जासई विभाग अध्यक्ष महेश कडू, रायगड जिल्हा चिटणीस शरद ठाकूर, रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य रमाकांत म्हात्रे, दहागाव विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, उरण तालुका चिटणीस बलीशेठ घरत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# चेक बँकेत वटवून ६५ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँकेत विसरलेल्या चेकबुकमधील चेक वटवून ६५ हजार ७५० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ. आशिष बांदेकर हे पळस्पे येथे राहत असून सर्व डेंटल डॉक्टरांची पनवेल डेंटल नावाची कमिटी आहे. डेंटल वेल्फेअर असोसिएशनचा वाशी येथे कार्यक्रम होता. त्या ठिकाणी खर्चासाठी बँकेतून पैसे काढण्यासाठी ते बँकेत गेले होते. त्यांनी पनवेल बँकेत जाऊन चेक देऊन पैसे काढले आणि चेकबुक बँकेतच विसरून निघून गेले होते. त्यावेळी चेकबुकमध्ये दोन ते तीन रिकामे चेक सह्या केलेले होते. वाशी येथे कार्यक्रमाचे ठिकाणी चेकबुक पाहत असताना त्यांना चेक बुक मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी घरी फोन केला तर घरी चेकबुक नव्हते. बँकेत चेकबुक राहिले असेल म्हणून बँकेसोबत संपर्क साधला असता बँकेत चेकबुक असल्याचे समजले.

यानंतर त्यांना काही वेळाने मोबाईलवर बँकेचा मेसेज आला आणि असोसिएशनच्या खात्यातून ६५ हजार ७५० रकमेचा धनादेश वटला गेल्याचे दिसून आले.यावेळी सही असलेल्या चेकपैकी एक चेक काढून तो बँकेत अनोळखी ईसमाने वटवला.

# रोडपाली-नावडा फाटा परिसरात अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंब्रा-पनवेल महामार्गावरील रोडपाली बौद्ध वाडाजवळून नावडा फाट्याकडे मोटरसायकलवरून जात असताना एका भरधाव ट्रकने दुचाकीस्वाराच्या डोक्यावरून गाडी चालविल्याने अत्यंत भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.

अपघात इतका भीषण होता की मोटरसायकल पूर्णपणे चिरडली गेली असून मृत व्यक्तीच्या डोक्याचा




चेंदामेंदा झाला. गंभीर जखमांमुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. विशेष म्हणजे, याच रोडपाली परिसरात अवघ्या दोन दिवसांपूर्वी एका महिलेचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. वारंवार अपघात होत असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महामार्गाचा हा भाग अत्यंत अपघातप्रवण ठरत असून, येथे तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर), सूचना फलक आणि वेग नियंत्रणाची व्यवस्था करण्याची गरज आहे. या संदर्भात समाजसेवक सुभाष गायकवाड यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला आहे.

प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास उपोषण करण्याचा इशारा सुभाष गायकवाड यांनी दिला आहे. सतत होणाऱ्या अपघातांमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे.

# कामोठ्यात अतिक्रमण, अनधिकृत बॅनरवर कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे मध्ये शुक्रवारी (दि. ३०) रोजी मानसरोवर रेल्वे स्थानक, खांदेश्वर रेल्वे स्थानक, छोटा खांदा गाव येथील फुटपाथवरील अतिक्रमणांवर व अनधिकृत बॅनरवर धडक कारवाई करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार प्रभाग समिती ‘क’ चे सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने व अधिक्षक दशरथ भंडारी यांनी अतिक्रमण विभागाच्यासाह्याने ही कारवाई केली. या कारवाई दरम्यान खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसरात अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या नीरा टपऱ्या काढण्यात आल्या. तसेच खांदेश्वर रोडवरील फुटपाथवरील अतिक्रमणांवर तोडक कारवाई करण्यात आली. तसेच अनधिकृत बॅनरवर धडक कारवाई करण्यात आली.

तसेच कामोठे रेल्वे स्थानक परिसरातील व छोटा खांदा गावातील फुटपाथवरील अतिक्रमण व अनधिकृत बॅनरवर तोडक कारवाई करण्यात आली.

# पनवेल पोलिसांनी चेनस्नॅचिंग गुन्ह्यातील आरोपींना सहा तासांत केली अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील भंगारपाडा येथे एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरीने खेचून घेऊन पळ काढणाऱ्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी चेनस्नॅचिंग गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या ६ तासात अटक केली आहे.

फिर्यादी मंजुळा हरिचंद्र दबडे (वय ५५ वर्षे, रा. पारगाव, दापोली) या भंगारपाडा येथे रोडने पायी जात असताना, एका अनोळखी आरोपीने फिर्यादी यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरीने खेचून घेऊन पळ काढला. या बाबत पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसी टिव्ही फुटेज तसेच तांत्रिक तपास करून आरोपीचे नाव निष्पन्न करून त्यास अटक करण्यात आली आहे.

आरोपीकडून सदर गुन्ह्यातील जबरी चोरी केलेली मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा संदेश म्हात्रे, अमोल पाटील यांनी केली.



# गतिमान कारभारासाठी पनवेलच्या नवनिर्वाचित नगरसेवकांना ‘टॅब’

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित ७८ नगरसेवकांना प्रथमच आधुनिक टॅबलेट (संगणक) तसेच महापालिका अधिनियमांचे मार्गदर्शक पुस्तक देण्याच्या हालचाली महापालिका प्रशासनात सुरू आहेत. या टॅबलेटच्या माध्यमातून नगरसेवकांनी महापालिकेचा दैनंदिन कारभार हाताळावा, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

नुकत्याच ई-गव्हर्नन्समध्ये राज्यातील सर्व महापालिकांमध्ये पनवेलने प्रथम क्रमांक पटकावत आपली डिजिटल क्षमता अधोरेखित केली आहे. सध्या महापालिकेत ई-ऑफीस प्रणालीद्वारे कामकाज सुरू असून आयुक्त चितळे यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम कारभार पेपरलेस करण्यावर भर दिला. त्यानुसार अधिकारी व कर्मचारी ई-ऑफीसवर काम करत आहेत. याच धर्तीवर नगरसेवकांनीही त्यांच्या तक्रारी, सूचना व पत्रव्यवहार टॅबवरून ई-मेलद्वारे केल्यास प्रशासनाकडून तातडीने त्यास प्रतिसाद देता येईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

२०१६ साली महापालिका स्थापन झाल्यानंतर २०१७ मधील पहिल्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांना अशी सुविधा दिली नव्हती. मात्र आता प्रत्येक प्रभागातील २० ते ३५ हजार मतदारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नगरसेवकांना थेट महापालिकेच्या संकेतस्थळावर नोंदविलेल्या नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा किती वेळेत होतो, यावर देखरेख ठेवता येणार आहे. यामुळे सेवाहमी नियमांचे पालन होते की नाही, यावरही नियंत्रण मिळणार आहे. १० फेब्रुवारी रोजी महापौर व उपमहापौर निवडीनंतर होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत नगरसेवकांना टॅबलेट उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे.

**प्रशासकीय गतिमानता, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी ई-गव्हर्नन्सचा वापर करण्यासाठी पदाधिकाऱ्यांना टॅब देण्यात येणार आहेत, ज्यामुळे नागरिकांना जलद सेवा आणि तात्काळ समस्या निवारण होईल.**
**-मंगेश चितळे,**
आयुक्त, पनवेल महापालिका

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर रेल्वे स्टेशन जवळील झोपडपट्टी परिसरातून एका १५ वर्षीय मुलाचे एका इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून कायदेशीर रखवलीतून पळवून नेल्याने सदर इसमा विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे. सदर मुलाचे नाव ईरवी सुरजसिंग रजगौड (वय १५ वर्षे) असून त्याचा रंग. सावळा, उंची. अंदाजे ४.४ फुट. नेसणीस, पांढऱ्या रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट. दोन्ही गालवार विरळ जशी जन्म खुणेची निशानी आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक महेंद्र डोके यांच्याशी संपर्क साधावा.



# पनवेल रेल्वे स्टेशन रस्त्यावर अपघात; एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर शुक्रवारी एका अनियंत्रित इको कारने भीषण अपघात घडवला. या अपघातात एका पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास कार्यास सुरुवात केली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, इको कार चालक पनवेल रेल्वे स्टेशनच्या दिशेने जात असताना अचानक त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. आणि कारने रस्त्यावरील एका ऑटो-रिक्षाला जोरदार धडक दिली आणि त्यानंतर पुढे असलेल्या एका वॅगनआर कारलाही धडक दिली. त्यानंतर या कारची एका पादचाऱ्याला धडक बसली, ज्यामध्ये त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून रिक्षा चालक सुद्धा जखमी झाला आहे. सदर मयत इसमाचे नाव धर्मेंद्र चौधरी असे आहे. याबाबत पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.



## सुभाष वाघपंजे यांचा पुरस्काराने गौरव

**पनवेल :** नाशिक येथे पार पडलेल्या भव्य महाराष्ट्र बिझनेस आयकॉन २०२५ पुरस्कार सोहळ्यात शासकीय परवानाधारक विद्युत कंत्राटदार तसेच राज इंटरप्रायजेसचे मालक सुभाष रामचंद्र वाघपंजे यांना त्यांच्या उल्लेखनीय व्यावसायिक कामगिरीबद्दल प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले.



हा सन्मान सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री व अभिनेती सोनाली कुलकर्णी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. विद्युत क्षेत्रात सुरक्षित, दर्जेदार व विश्वासार्ह सेवा देत अनेक औद्योगिक, व्यावसायिक व निवासी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल श्री. वाघपांजे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील अनेक नामांकित उद्योजक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये २५ हजारांचा गांजा जप्त; दोन आरोपी अटकेत



**पनवेल : वार्ताहर**

शहरात वाहतूक नियमांची अंमलबजावणी करत असताना पनवेल वाहतूक शाखेने स्कुटर मध्ये २५ हजारांचा गांजा सापडल्याने अमलीपदार्थ विरोधी कायद्यान्वये पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस नाईक राकेश राजपूत, वाहतूक शाखा पनवेल शहर, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विना हेल्मेट वाहन तपासणी करत असताना व्हिस्पा कंपनीची स्कुटर संशयास्पदरीत्या थांबविण्यात आली. तपासणीदरम्यान सदर स्कुटरच्या डिक्कीतून सुमारे २५,००० रुपये किंमतीचा २९ ग्रॅम वजनाचा उग्र वास असलेला हायड्रो गांजा आढळून आला.

या प्रकरणी पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. कारवाईदरम्यान एकूण सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# माळी समाजाच्या वतीने रूपाली शिंदे यांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६मध्ये सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असणाऱ्या रुपाली शिंदे यांचा क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या कार्यालयात जाहीर सत्कार करण्यात आला. समाजासाठी घेतलेल्या ठाम आणि प्रामाणिक भूमिकेला आज समाजाने उघड पाठिंबा दिला.

पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ दरम्यान समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या शब्दाला मान देत बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका डॉ. प्रियांका तेजस कांडपिळे यांना संधी देत सामाजिक कार्यकर्त्या रुपाली शिंदे यांनी दाखवलेला मनाचा मोठेपणा दाखविला. सावित्रीच्या लेकीचा हा मोठेपणा आहे, अशी भावना या वेळी उपस्थित ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केली. याच कार्यक्रमात सोशल मीडियावरून सुरू असलेल्या खोडसाळपणावर जोरदार प्रहार करण्यात आला.



पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, समाजात तेढ निर्माण करणारा, सोशल मीडियावरून चालवलेला अपप्रचार चुकीचा आहे आणि अशा खोडसाळपणाला अजिबात थारा दिला जाणार नाही हा थेट इशाराच असल्याचं राजकीय वर्तुळात बोललं जात आहे.

माळी समाजाच्या वतीने रुपाली शिंदे यांचे मनापासून आभार मानत समाजाची ताकद त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असा स्पष्ट संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते सुधीर कांडपिळे, मनोहर कांडपिळे, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका डॉ. प्रियांका कांडपिळे, तसेच विजय भुजबळ, संध्या भुजबळ, कृपेश कांडपिळे, स्नेहा धुमाळ, राखी मोहिते, साहिल मोरे, नितीन भुजबळ, अजित लोंढे, सिद्धेश, अंकित भुजबळ आणि समस्त माळी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## संपादकीय

# मानसिकतेत बदल हवा

उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव रोखण्याकरिता सुधारित नियमावली तयार करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला (यूजीसी) दिला होता. त्यानुसार आयोगाने नियमावली तयार केली, परंतु या नियमावलीच्या गैरवापराची भीती व्यक्त करून नियमावलीला विरोध झाला. ही भीती नियमांमधील संदिग्धतेमुळे वाटली असावी असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आणि यूजीसीने लागू केलेल्या सुधारित धोरणाला तूर्तास स्थगिती दिली. हा विषय गुंतागुंतीचा असल्याने त्यावर तोडगा काढणे आव्हानात्मक आहे हे मान्य करावेच लागेल.

**निरनिराळ्या सामाजिक गटांना सामावून घेण्यासाठी धोरण आखताना तारेवरची कसरत आपल्या देशात कायमच करावी लागलेली आहे. त्याच परिस्थितीला 'विद्यापीठ अनुदान आयोग' म्हणजेच यूजीसीला तोंड द्यावे लागते आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांमधील जातीवर आधारित भेदभाव रोखण्यासाठी सुधारित धोरण आखण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने यूजीसीला दिला होता. त्यानुसार आखण्यात आलेल्या नव्या नियमांमागील हेतू चांगलाच आहे, परंतु त्यांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यापूर्वी सर्वसंबंधित घटकांशी विचारविनिमय करून सर्वमान्य असे बदल तीत करणे आवश्यक आहे असे दिसते. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीनंतर या नियमांमध्ये काही सुधारणा केली जाते का हे येत्या काळात दिसेल. आपल्या समाजात आजही जातिभेद अस्तित्वात आहेत व कमीअधिक प्रखरतेने ते निरनिराळ्या भागांमध्ये अनुभवले जातात हे नाकारता येणार नाही. भेदभावरहित समाज निर्माण करण्याच्या मार्गावरील आपली वाटचाल अद्याप पूर्ण झालेली नाही. शिक्षणसंस्थांमध्ये देशाचे उद्याचे भवितव्य घडत असते. त्यामुळे या संस्थांमधील भेदभाव संपुष्टात आणणे महत्त्वाचे आहेच, परंतु संबंधित धोरण आखताना ते अतिशय संवेदनशीलतेने व विचारपूर्वक करायला हवे. खेरीज अशी धोरणे वा नियमावली ही निव्वळ कागदोपत्री न आखली जाता ती सर्व विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत रूजावीत यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न व्हायला हवेत. समतेचे मूल्य हे आपल्या राज्यघटनेने स्वीकारलेले आहे याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून रुजायला हवी. वास्तवात आज आपण त्यापासून दूर आहोत असे म्हणायला जागा आहे हे यूजीसीला धोरणसुधारणेची गरज पडली यातूनच स्पष्ट होते. हैदराबाद विद्यापीठातील विद्यार्थी रोहित वेमुला आणि मुंबईतील वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेणारी डॉ. पायल तडवी या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. त्यामागे शिक्षणसंस्थेतील जातीय भेदभाव होता असे समोर आले. या प्रकरणांसंबंधात दाखल याचिकांच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने धोरणात सुधारणा करण्याचे आदेश यूजीसीला दिले. त्यानुसार तयार केलेले सुधारित धोरण यूजीसीने काही दिवसांपूर्वी जाहीर केले असता त्यावरून काही राज्यांमध्ये विरोध व वाद उफाळून आला. अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक व दिव्यांग विद्यार्थ्यांना भेदभावाविरोधात तक्रार दाखल करता यावी यासाठी जुन्या धोरणानुसार महाविद्यालयांमध्ये समान संधी कक्ष स्थापन करणे बंधनकारक होते. परंतु वेळेत कार्यवाही होत नाही ही तक्रार यासंदर्भात होती. त्यामुळे नियमांत बदल करून चौकशीसाठी कालमर्यादा आदी बदल करण्यात आले, परंतु जातीय भेदभावासोबतच रॅगिंगची समस्याही तीव्र आहेच. त्यामुळे याविषयीच्या नियमांना आक्षेप घेतले गेले. सर्व संबंधित घटकांशी बोलूनच या संदर्भातील नियमांची आखणी व्हायला हवी. तरतुदींचा गैरवापर होऊ नये यासाठीही विचारपूर्वक उपाययोजना हवी. आक्षेपांना विचारात घेऊन आवश्यक तिथे संदिग्धता दूर करावी लागेल. निव्वळ नियम आणि कायद्यांतून या समस्यांवर कायमचा तोडगा काढता येणार नाही हेही ध्यानात घ्यावे लागेलच.**

# नाटककार, लेखक, कादंबरीकार वसंत कानेटकर

वसंत शंकर कानेटकर (२० मार्च १९२२ –३१ जानेवारी २००१) यांची ओळख लोकप्रिय मराठी नाटककार, लेखक, कादंबरीकार आणि विचारवंत अशी राहिली आहे. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याच्या कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर या गावी झाला. ते चार भावंडांपैकी दुसरे होते. प्रसिद्ध कवी शंकर केशव कानेटकर हे त्यांचे वडील. ते गिरीश या टोपणनावाने महाराष्ट्रात ओळखले जात. वसंतरावांच्या आई, उमा शंकर कानेटकर या बुधगाव संस्थानचे मुन्सफ गोविंद विनायक श्रीखंडे यांच्या कन्या होत.

वसंत कानेटकर यांचे सुरुवातीचे आयुष्य पुण्यात गेले. त्यांचे वडील, कवी गिरीश हे रविकिरण मंडळाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. वडिलांच्या आणि रविकिरण मंडळातील इतर कवी यांच्या सहवासातून वसंत कानेटकरांना साहित्यात रस निर्माण झाला. कवी गिरीश हे महाराष्ट्रभर काव्यगायनासाठी जात. तेव्हा त्यांच्या कार्यक्रमात अनेक वेळा वसंतराव आणि त्यांची भावंडे सहभागी होत असत. याचा उपयोग त्यांच्या साहित्यिक जडणघडणीत झाला. ते लहानपणी नाटिका लिहीत आणि त्यांच्या बालमित्रांसोबत त्यांचे सादरीकरणही करीत.

कानेटकरांनी १९४२–४३मध्ये पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून बीएची पदवी संपादन केली. उच्चशिक्षण घेत असताना कानेटकरांना वि.स. खांडेकर आणि कन्नड साहित्यिक आणि तत्कालीन विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य वि.कृ. गोकाक दोन ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांचे मार्गदर्शन लाभले. १९४६मध्ये कानेटकर नाशिकमधील गोखले एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या एचपीटी आर्टस् कॉलेजमध्ये मराठी व इंग्रजीचे व्याख्याते म्हणून रुजू झाले. पुढे त्यांना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली आणि या संस्थेचे ते आजीव सदस्यदेखील झाले. शिकवत असतानाच त्यांनी लघुकथा लेखक आणि कादंबरीकार म्हणून आपली लेखन कारकीर्द सुरू केली. मनोहर आणि सत्यकथा यांसारख्या नियतकालिकांमधून त्यांनी लिहिलेल्या लघुकथा प्रसिद्ध झाल्या. १९५० ते १९५७ याकाळात त्यांच्या घर, पंख आणि पोरका या तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

१९५७मध्ये कानेटकरांनी आपले पहिले नाटक वेड्याचे घर उन्हात लिहिले. हे नाटक भालबा केळकर यांनी दिग्दर्शित केले, तर पुण्यातील प्रोग्रेसिव्ह ड्रामाटिक असोसिएशनने त्याची निर्मिती केली. नाटकातील मध्यवर्ती भूमिका श्रीराम लागू यांनी निभावली होती. कालबाह्य रूढी–परंपरा आणि कर्तव्य यांच्या ओझ्याखाली दबलेल्या एका मनस्वी, कलासक्त, संपन्न व्यक्तिमत्त्वाची ही शोकांतिका. हे नाविन्यपूर्ण नाटक समीक्षकांना तर आवडलेच,



पण व्यावसायिकदृष्ट्ययाही यशस्वी ठरले. याच्या यशानंतर कानेटकरांचे दुसरे मानवतेच्या भवितव्याबद्दल आणि अस्तित्वाबद्दल चिंतन करणारे कल्पनारम्य नाटक देवांचे मनोराज्य आले, मात्र या नाटकास तितकेसे व्यावसायिक यश मिळाले नाही. त्यांचे तिसरे नाटक प्रेमा, तुझा रंग कसा?, ही एक हलकी–फुलकी विनोदी, खेळकर सुखात्मिका होती. पुन्हा एकदा त्यांनी वेगळा विषय आणि शैली निवडली होती. या नाटकास अभूतपूर्व व्यावसायिक यश मिळाले व आजही ते त्यांच्या सर्वांत लोकप्रिय नाटकांपैकी एक म्हणून गणले जाते.

कानेटकरांनी रायगडाला जेव्हां जाग येते या ऐतिहासिक नाटकात छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्यातील पिता–पुत्राच्या संबंधांचे अंतरंग मांडले. या नाटकाच्या लेखनतयारीसाठी त्यांना दोन वर्षे लागली. त्यांनी स्वतः रायगड किल्ल्याला भेट दिली, इतिहासकार सेतुमाधवराव पगडी आणि शाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी चर्चा केल्या, ऐतिहासिक नोंदी वाचल्या. ऐतिहासिक मराठी भाषा अंगवळणी पडण्यासाठी प्राध्यापक म्हणून बखरदेखील शिकवायला घेतली. हे नाटक मराठी रंगभूमीवर एक मैलाचा दगड ठरले. या नाटकातील काशिनाथ घाणेकर यांची संभाजी महाराजांची भूमिका विशेष गाजली.

कानेटकरांचे पुढचे नाटक अश्रूंची झाली फुले हे त्यांचे सर्वांत यशस्वी नाटक. हे एक सामाजिक, भावनाप्रधान नाटक होते. या नाटकाची निर्मिती व दिग्दर्शन प्रभाकर पणशीकर यांनी केले तसेच त्यांनी या नाटकात प्रा.विद्यानंद ही मुख्य भूमिकादेखील निभावली. चित्तरंजन कोल्हटकर यांची शंभू महादेव आणि काशिनाथ घाणेकर यांची लाल्या या भूमिका विशेष गाजल्या. हिंदी चित्रपट अभिनेते आणि निर्माते अशोककुमार यांनी या नाटकावर आधारित आंसू बन गये फूल हा हिंदी चित्रपट बनविला. या चित्रपटासाठी कानेटकरांना सर्वोत्कृष्ट कथेसाठीचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला.

१९७३मध्ये कानेटकरांनी अध्यापनातून स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि ते पूर्णवेळ व्यावसायिक नाटककार बनले. ५४ वर्षांच्या लेखन कारकीर्दीत त्यांनी ४२ तीन अंकी नाटके, चार कादंबऱ्या आणि अनेक एकांकिका, लघुकथा, चिंतनपर लेख, चित्रपट आणि टीव्ही मालिकांसाठी पटकथा लिहिल्या. त्यांची अनेक नाटके हिंदी व गुजराती भाषांमध्ये रूपांतरित झालेली आहेत.

कानेटकरांचे लेखक म्हणून अनेक शैलींवरील प्रभुत्व, विषयांचे वैविध्य, नाट्यतंत्रावरील पकड, भाषासौंदर्य आणि संस्मरणीय संवाद यांकरिता ते प्रख्यात होते. १९५०च्या दशकात व्यावसायिक मराठी रंगभूमीचे पुनरुज्जीवन करण्याचे आणि पुढची चार दशके एकापाठोपाठ एक सरस आणि यशस्वी नाटके देऊन तिला समृद्ध करण्याचे श्रेयही मोठ्या प्रमाणात त्यांना जाते. वेड्याचे घर उन्हांत या नाटकापासून त्यांची नाटककार म्हणून वाटचाल सुरू झाली आणि पुढची चाळीस वर्षे त्यांनी मराठी रंगभूमी गाजवली. या त्यांच्या पहिल्या नाटकाच्यावेळी संगीत नाटकांचे युग नुकतेच संपले होते. व्यावसायिक मराठी रंगभूमीची अवस्था बिकट होती. त्यांच्या नाटकांच्या व्यावसायिक यशाने संपूर्ण नाट्यव्यवसाय पुनः बहरला. कलावैभव, नाट्यसंपदा, चंद्रलेखा अशा अनेक नाटक कंपन्यांना कानेटकरांच्या नाटकांमुळे मोठ्या प्रमाणात यश मिळाले. अभिनेते श्रीराम लागू, काशिनाथ घाणेकर, वंदना गुप्ते असे अनेक कलाकार त्यांच्या नाटकांमधून पुढे आले.

कानेटकरांनी आपल्या ऐतिहासिक नाटकांमध्ये महापुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि संवेदनांचा शोध घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापासून ते छत्रपती संभाजी राजेंच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने महाराष्ट्रावर केलेली स्वारी या कालखंडावर आधारित पाच ऐतिहासिक नाटकांचे नाट्यपंचक त्यांनी साकारले. ही पाच नाटके म्हणजे – रायगडाला जेव्हां जागे येते, इथे ओशाळला मृत्यू, तुझा तू वाढवी राजा, आकाशमिठी आणि जिथे गवतास भाले फुटतात ही होत. संगीत नाटकातदेखील त्यांनी क्रांती घडवून आणली. शेक्सपिअरच्या शोकांतिका, आधुनिक संवेदनशीलता आणि महाभारतातील पौराणिक कथा एकत्र करून त्यांनी संगीत मत्स्यगंधा हे नाटक लिहिले. लेकुरे उदंड जाली यामध्ये त्यांनी चौथी भिंत तोडली आणि नायकाला थेट प्रेक्षकांशी संवाद साधायला लावला. त्यांच्या सर्व संगीत नाटकांसाठी पंडित जितेंद्र अभिषेकींनी उत्तम संगीत दिले.

महाराष्ट्रातील अनेक प्रख्यात व्यक्तींच्या आयुष्यावर कानेटकरांनी चरित्रनाटके लिहिली. हिमालयाची सावली (धोंडो केशव कर्वे), वादळ माणसाळतंय (बाबा आमटे), विषवृक्षाची छाया (इतिहासाचार्य वि. का. राजवाडे), कस्तुरीमृग (हिराबाई पेडणेकर) आणि तू तर चाफेकळी (बालकवी ठोंबरे) ही ती नाटके आहेत.

कानेटकर यांच्या प्रेमा, तुझा रंग कसा?, प्रेमाच्या गावा जावे, लेकुरे उदंड जाली, मदनबाधा, छू मंतर! आणि सूर्याची पिल्ले इत्यादी हलक्याफुलक्या विनोदी सुखात्मिका अत्यंत लोकप्रिय ठरल्या. शेक्सपियरच्या नाटकांचा कानेटकरांवर विशेष प्रभाव होता.

वसंत कानेटकर यांच्या कलाकृतींना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. वेड्याचे घर उन्हात या त्यांच्या पहिल्या नाटकाने महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील बहुतांशी बक्षिसे जिंकली (१९५८). देवांचे मनोराज्य, प्रेमा, तुझा रंग कसा? आणि रायगडाला जेव्हां जाग येते यांना महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतील पहिले पारितोषिक मिळाले. संगीत नाटक अकादमीने रायगडाला जेव्हां जाग येते या नाटकाला बेस्ट इंडियन प्ले पुरस्काराने सन्मानित केले (१९६४). या पुरस्काराचा भाग म्हणून या नाटकाचे १४ भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले आणि आकाशवाणीच्या राष्ट्रीय कार्यक्रमात प्रसारण झाले. हे नाटक मुंबई विद्यापीठाच्या पदवीपूर्व कला अभ्यासक्रमातही सामील झाले आणि यामुळे अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वतःचे नाटक शिकवण्याचा मान कानेटकरांना मिळाला. १९७१ मध्ये ते कुर्ला, मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. १९७७ मध्ये त्यांना कस्तुरीमृग या नाटकासाठी सर्वोत्कृष्ट नाटक व सर्वोत्कृष्ट नाटककार असे कलादर्पण पुरस्कार मिळाले. त्यांना संगीत नाटक अकादमीने सर्व भारतीय भाषांमधील सर्वोत्कृष्ट नाटककार म्हणून गौरविले आहे (१९८४). ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली (१९८८). त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र गौरव (१९९०) आणि भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले (१९९२).

वसंत कानेटकरांचा सिंधूताई यांच्याशी विवाह झाला (१९४२). या दाम्पत्यास चंद्रलेखा (कन्या) आणि प्रियदर्शन (पुत्र) ही दोन अपत्ये. वसंत कानेटकर यांचे नाशिक येथे निधन झाले.

*(साभार : मराठी विश्वकोष)*



## बदलते तंत्रज्ञान

# इंटरनेटशिवाय गुगल मॅप्स वापरणे शक्य, जाणून घ्या..

तुम्हाला आज आम्ही Google Mapsच्या एका नव्या फीचरविषयी माहिती देणार आहोत. Google Maps वापरणे खूप सोयीस्कर आहे, परंतु त्यासाठी नेहमीच स्थिर इंटरनेट कनेक्शन आवश्यक असते. दुर्गम भागात जिथे स्थिर इंटरनेट कनेक्शन नाही, तिथे खूप समस्या निर्माण होऊ शकते, मात्र Google Mapsच्या सर्व फीचर्सची माहिती अनेकांना नसते. असेच एक फीचर्स म्हणजे ऑफलाईन मॅप्सचा वापर. युजर्स इंटरनेटशिवायही गुगल मॅप्सचा वापर करू शकतात. ते कसे करावे ते जाणून घेऊया...



इंटरनेट सुविधा नसलेल्या भागात जाण्यापूर्वी ऑफलाइन वापरासाठी मॅप्स डाऊनलोड करणे आवश्यक आहे. चला जाणून घेऊया याच्या स्टेप्स

Google Maps इंटरनेटशिवाय कसे वापरावे?

Google Maps उघडा. प्रोफाइल आयकॉन ऑफलाईन मॅप्स टॅप करा  आपला स्वतःचा मॅप्स निवडा. डाउनलोड करण्यासाठी क्षेत्र निवडण्यासाठी झूम इन किंवा आउट करा, नंतर डाउनलोड बटणावर टॅप करा. ऑफलाईन मॅप्स भरपूर स्टोरेज स्पेस वापरू शकतात (क्षेत्रफळानुसार १.५ जीबी किंवा त्यापेक्षा जास्त). मग ऑफलाईन असताना त्या ठिकाणी जाऊन हा डाऊनलोड केलेला मॅप्स वापरता येतो.


मायक्रोएसडी कार्डला सपोर्ट करणाऱ्या डिव्हाइसेससाठी, डाउनलोड केलेले मॅप्स प्रोफाइल आयकॉन  ऑफलाइन मॅप्स गिअर आयकॉन  स्टोरेज प्रेफरन्समध्ये जाऊन एसडी कार्ड सिलेक्ट करून एसडी कार्डमध्ये शेअर केले जाऊ शकतात.

ऑफलाइन मॅप्स केवळ काही आठवडे टिकतात आणि १५ दिवसांनंतर आपोआप कालबाह्य होतात. Google Maps अधूनमधून मॅप्सवर मार्ग, व्यवसाय आणि पायाभूत बदल अपडेट करतात.

ऑफलाईन मॅप्स शोधणे, नेव्हिगेट करणे आणि दिशा घेणे यासारख्या कार्यांसाठी वापरले जाऊ शकतात, परंतु रिअल टाइम ट्रॅफिक, पर्यायी मार्ग, सार्वजनिक वाहतूक आणि दुचाकी/वॉक दिशा अशा काही सेवा उपलब्ध नाहीत. एकूणच Google Mapsच्या ऑफलाइन फीचरमुळे इंटरनेटशिवाय प्रवास करणं आता आव्हानात्मक राहिलेलं नाही. मॅप्स डाऊनलोड करून, युजर्स आवश्यक नेव्हिगेशन टूल्समध्ये प्रवेश करू शकतात, अपडेट मिळवू शकतात आणि मर्यादा समजून घेऊ शकतात.

# गीतकार, कवी व लेखक गंगाधर महांबरे

गंगाधर महांबरे हे मराठी लेखक, कवी व गीतकार होते. त्यांचा जन्म ३१ जानेवारी १९३१ रोजी कोकणातील मालवण येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मालवणच्या रघुनाथ देसाई या मराठी शाळेत, तर माध्यमिक शिक्षण टोपीवाला हायस्कूलमध्ये झाले. शालांत परीक्षा १९४९ साली ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९५६ साली त्यांनी बीएची पदवी मिळविली. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात काही काळ त्यांनी ग्रंथपाल म्हणून नोकरी केली. त्यानंतर पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये, किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या ग्रंथालयात आणि पुण्याच्या ऑटोमोटिव्ह रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये ग्रंथपाल म्हणूनही काम पाहिले.



महांबरे यांच्या लेखनाची सुरुवात १९४८पासून झाली. 'दिलजमाई', 'रंगपंचमी', 'सिंधुदुर्ग', 'कोल्हा आणि द्राक्षे' अशा अनेक नाटिका. 'देवदूत', 'संतांची कृपा', 'नजराणा' इ. नाटकं. 'गौतमबुद्ध', 'जादूचा वेल', 'जादूची नगरी', 'बेनहर' ही बालसाहित्याची पुस्तके; तर 'चार्ली चॅपलीन, वॉल्ट डिस्नी यांची चरित्रे' इ. त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. रंगभूमीवरील गाण्यांचा संग्रह, नाटकातील गाणी, महाराष्ट्र गौरवगीते, पी. सावळाराम, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे यांच्या गीतांचे संग्रह त्यांनी संपादित

## निमित्त

केले तसेच 'आपली आवड', 'उषःकाल', 'रसिका तुझ्याचसाठी', 'मराठी गजल', 'आनंदाचे डोही' इत्यादी त्यांचे गीत संग्रह प्रकाशित आहेत.

उत्तम भावगीतरचनांप्रमाणेच त्यानी सुरेख चित्रदर्शी भावरम्य चित्रपट गीते लिहिली होती. त्यामुळे त्यांची चित्रपटगीतकार म्हणून सर्वदूर ख्याती पसरली. 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या, नववधू प्रिया मी बावरते, मधू मागशी माझ्या सख्यापरी, जन पळभर म्हणतील हाय हाय', 'मावळत्या दिनकरा' इत्यादी कित्येक गीते आज आकाशवाणी, टीव्ही, सीडी या माध्यमातून लोकप्रिय झालेली आहेत. त्यांनी 'कंठातच रुतल्या ताना','संधीकाली या अशा', 'नयनात तुझ्या सखि सावन का?' अशा कित्येक सुंदर उत्कट भावकविता लिहिल्या.

भारतीय आकाशवाणीचे एक मान्यवर गीतकार म्हणून महांबरे यांचे आकाशवाणीसाठी योगदान आहे. चित्रपट रंगभूमी, आकाशवाणी, दूरदर्शन, ध्वनीमुद्रिका, संगीत मैफल, कॅसेटस् आणि आता सीडी इत्यादी माध्यमांनी कवी गंगाधर महांबरे यांच्या गीतांचा अनुरुप उपयोग करून घेतला आहे. 'रसिका तुझ्याच साठी' या त्यांच्या गीताची ध्वनिमुद्रिका एका अमेरिकन कंपनीनेही प्रसिद्ध केली होती. सुप्रसिद्ध नाटककार व बंगाली वाङ्मयाचे अभ्यासक मालवणचे नामवंत साहित्यिक भार्गवराम विठ्ठल तथा मामा वरेरकर यांचा जीवनपट चितारणारे 'एक अविस्मरणीय मामा' हा छोटासा चरित्रग्रंथ महांबरे यांनी लिहिला आहे.

नवी दिल्ली येथील नॅशनल प्रोडक्टिव्हिटी कौन्सिलने महांबरे यांना १९८३ साली पोएट ऑफ दि इयर हा सन्मान दिलेला असून गोव्याच्या गोमंतक मराठी अकादमीने सन्माननीय फेलोशिप दिली होती. केंद्र सरकारचे आणि महाराष्ट्र सरकारचे अन्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले होते. अशा या चतुरस्त्र लेखकाचे २३ डिसेंबर २००८ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# ध्वनी प्रदूषणामुळे लोकांचे मानसिक आरोग्य धोक्यात

आजकाल वाढदिवस असो वा लग्न, लाऊड म्युझिक आणि डीजेशिवाय कोणतंही सेलिब्रेशन पूर्ण होत नाही, याशिवाय जगातील वाढती लोकसंख्या आणि वाहतूक यामुळे वातावरणातील ध्वनी प्रदूषण वाढतच चालले आहे. या ध्वनी प्रदूषणामुळे तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. अनेक आरोग्य अहवालांमध्ये ध्वनी प्रदूषणाच्या धोकादायक दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च रक्तदाब, झोप न लागणे, झोपेचे खराब शेड्युल, तणाव, चिंता आणि ऐकू कमी येणे या काही सामान्य समस्या आहेत.



ध्वनी प्रदूषणाचा मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो. एखाद्या व्यक्तीचा मेंदू मोठ्या आवाजाबाबत सदैव नेहमी अलर्ट किंवा सतर्क असतो. त्यामुळे अशा परिस्थितीत ध्वनी प्रदूषणात दीर्घकाळ राहिल्याने चिंता आणि तणाव निर्माण होऊ शकतो. सतत ध्वनी प्रदूषणात राहणारे लोक तणावासाठी खूप संवेदनशील असतात. ध्वनी प्रदूषणामुळे लोकांमध्ये चिडचिड होणे, अस्वस्थ वाटणे, तणाव वाटणे, निराश होणे आणि राग येणे अशा समस्या उद्भवू शकतात. तुमच्या आजूबाजूच्या उच्च आवाजावर नियंत्रण ठेवणे शक्य नसेल तर तुम्ही तुमच्या मानसिक आरोग्याची विशेष काळजी घेतली पाहिजे.

ध्वनी प्रदूषणाचा मनुष्याच्या झोपण्याच्या वेळापत्रकावर सर्वात जास्त परिणाम होतो. झोप न लागणे, मध्येच झोप मोडणे, झोप पूर्ण होण्यापूर्वी जागे होणे, असा त्रास होतो. खराब झोपेच्या वेळापत्रकामुळे एखाद्या व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो, मात्र यामुळे तुमची एकाग्रता भंग होऊ शकते आणि मूड खराब होऊन तुमच्या समस्या वाढू शकतात.

ध्वनी प्रदूषणाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रकारे शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. मोठ्या आवाजामुळे काही वेळा गंभीर परिस्थिती उद्भवू शकते, काही वेळेस त्या व्यक्तीच्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. काही सामान्य परिस्थितींमध्ये ध्वनी प्रदूषणामुळे कानात सतत मोठा आवाज वाजत रहाणे आणि कान खराब होणे किंवा बहिरेपणा येऊ शकतो.

सतत ध्वनी प्रदूषणाच्या संपर्कात राहिल्याने उच्च रक्तदाब, ब्लड विस्कोसिटी आणि कार्डिओव्हॅस्क्युलर रोगांचा धोका वाढू शकतो. मोठा आवाज आणि ध्वनी प्रदूषण हे मज्जासंस्थेसाठी धोकादायक असतात, ज्यामुळे शरीरातील स्ट्रेस हार्मोन्स वाढतात. त्यामुळे दीर्घकालीन समस्या उद्भवू शकतात. गरोदर महिलांसाठी ध्वनी प्रदूषण खूप धोकादायक ठरू शकते.

# वरसे ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचा विळखा

## मोकाट प्राण्यांमुळे अपघातांचा धोका वाढला



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड या मुख्य व अत्यंत वर्दळीच्या मार्गालगत वरसे ग्रामपंचायत हद्दीत खुलेआम कचरा टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून प्रवाशांच्या जीवाशी थेट खेळ सुरू झाला आहे. विशेषतः पुलालगत अनेक दिवसांपासून प्लास्टिक पिशव्या, उरलेले अन्नपदार्थ व विविध कचऱ्याचे ढिग साचले असून त्यातून तीव्र दुर्गंधी पसरत आहे.

या साचलेल्या कचऱ्यामुळे मोकाट कुत्रे व डुक्कर मोठ्या प्रमाणावर येथे गोळा होत असून हे प्राणी अचानक रस्त्यावर येत असल्याने वाहनचालकांसमोर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

कोलाड-रोहा रस्ता हा नेहमीच गजबजलेला असून कामगार वर्ग, प्रवासी तसेच शाळकरी मुलांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. समोरच शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार याच ठिकाणी यापूर्वीही अनेक लहान-मोठे अपघात झाले असून त्यामागे मोकाट प्राणी व रस्त्यावरची घाण ही प्रमुख कारणे ठरली आहेत. तरीदेखील संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, ही बाब संतापजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करावी तसेच नियमित कचरा संकलन, डबे बसवणे व स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी प्रवासी वर्ग व ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे. अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# वासांबे जि.प. गटात महायुतीचा जोरदार प्रचार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी भारतीय जनता पार्टी, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या महायुतीच्या प्रचाराला टाकेदेवीचे दर्शन घेऊन शुभारंभ करत प्रचाराचे रणशिंग फुंकले.

तळेगाव वाडी, तळेगाव, पानशिल,आळी आंबिवली,खाने आंबिवली,वरोसे,रिस आदी जिल्हा परिषद विभागात प्रचारार्थ उपस्थित जनसमुदाय पाहता विजयाची नांदी दिसून आली. प्रत्यक्ष जनसंपर्क मोहिमेदरम्यान नागरिकांनी महायुतीच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रचंड पाठिंबा दर्शविला.

वासांबे जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार नेहा भूषण पारंगे आणि वासांबे पंचायत समिती गणाच्या उमेदवार अर्चना आत्माराम भोईर यांच्या प्रचार दौऱ्याला सर्वत्र सकारात्मक प्रतिसाद मिळत असून विकासाभिमुख नेतृत्वावर मतदारांचा ठाम विश्वास दिसून येत आहे.

या प्रचारात महायुतीचे प्रमुख पदाधिकारी सचिन तांडेल, राकेश खारकर, लक्ष्मणशेठ पारंगे, स्वप्नील राऊत, आकाश जुईकर, सतिश महाडीक, कैलास म्हात्रे, संतोष पाटील, महेंद्र धनगावकर, किरण कांबळे, दीपक कांबळे, जयदत्त भोईर, विश्वास पारगे, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) वैजयंती ठाकूर, ताई पवार यांच्यासह वासांबे विभागातील असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रचारात उसळलेली गर्दी, कार्यकर्त्यांचा जोश आणि मतदारांचा सकारात्मक कौल पाहता वासांबे जिल्हा परिषद विभागात निवडणूक रणधुमाळीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जंजिरा मुक्ती संग्राम दिन आज होणार साजरा

## नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड,म्हसळा व श्रीवर्धन हे तीन तालुके जंजिरा संस्थांच्या ताब्यात होते.मुरुड येथील भव्य दिव्य राजवाड्यामधून जंजिऱ्याचे नवाब सर सिद्धी अहमद खान हे या तीन तालुक्याचा कारभार चालवत असत.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर हे तीन तालुके सुद्धा भारत सामील व्हावे यासाठी येथे स्वतंत्र चळवळ उभी राहिली होती.



जंजिरा मुक्ती संग्राम दिन हा ३१ जानेवारी १९४८ रोजी जंजिरा संस्थान भारतात विलीन झाल्याच्या उपलक्ष्याने साजरा केला जातो. जंजिरा मुक्ती संग्रामात नानासाहेब पुरोहित, हरिभाऊ भडसावळे, मोहन धारिया, गोविंद लिमये, राजाभाऊ चांदोरकर, दतात्रेय कुंटे, सदाशिव बागाईतकर, केशवराव खांबेटे आदी मंडळींनी लढा दिला आणि मोलाची कामगिरी बजावली होती.

स्वातंत्र्य चळवळीने वेग घेऊन सर्वप्रथम म्हसळा व श्रीवर्धन या तालुक्याचा ताबा मिळवल्यानंतर आता मुरुड सुद्धा ताब्यात घेण्यात येईल या भीतीने जंजिऱ्याचे नवाब घाबरून जाऊन त्यांनी थेट मुंबई गाठून त्यावेळचे तत्कालीन मुख्यमंत्री बा. ग.खैर यांना भेटून शामिलनाम्यावर सही केली होती.३१ जानेवारी १९४८ रोजी सही केल्याने खऱ्या अर्थाने हे तीन तालुके भारतात समाविष्ट झाले होते तेव्हा हा दीन जंजिरा मुक्ती संग्राम दीन म्हणून ओळखला जातो.

जंजिरा संस्थान भारतात विलीन झाल्याच्या ऐतिहासिक घटनेला स्मरणार्थ साजरा होणारा जंजिरा मुक्ती संग्राम दिन दि. ३१ जानेवारी रोजी शासकीय पातळीवर साजरा करण्यात यावा, अशी मागणी रायगड प्रेस क्लब व मुरूड तालुका पत्रकार संघ करीत आहे.

जो पर्यंत शासन लक्ष देत नाही तोपर्यंत हा दीन पत्रकार संघ साजरा करत असतो.३१ जानेवारी रोजी आझाद चौकामध्ये मुरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी ध्वजारोहण संपन्न झाल्यावर मुरुड तालुका पत्रकार संघतर्फे जंजिरा संस्थान बद्दलचा इतिहास सांगण्यात येणार आहे.सदरील ध्वजारोहण कार्यक्रमास सर्व नगरसेवक,प्रतिष्ठित नागरिक व सर्व अधिकारी वृंद उपस्थित राहणार आहेत.

या दिनास शासकीय मान्यता मिळाल्यास रायगड जिल्ह्याच्या इतिहासाला योग्य तो सन्मान मिळेल, तसेच नव्या पिढीमध्ये स्वातंत्र्यलढ्याची जाणीव व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत होईल, असे मत मुरुड तालुका पत्रकार संघ व रायगड प्रेस क्लब तर्फे व्यक्त करण्यात आले आहे.

# नेरळ कोलीवली येथे हरिनाम सोहळ्याला सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळजवळील कोलीवली गाव आणि परिसराच्या वतीने अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन केले आहे. श्री संत सेवा वारकरी संप्रदाय मंडळ यांच्या अखंड हरिनाम ज्ञानयज्ञ सोहळ्याला २४ वर्षे पूर्ण झाली असून यावर्षी २५ व्या वर्षी हा सोहळा साजरा होत आहे. या अखंड हरिनाम सोहळ्याला संत ज्ञानेश्वर पारायणाने सुरुवात झाली.

कर्जत तालुक्यातील नेरळ जवळील कोलिवली आणि परिसरातील वारकरी संप्रदायामुळे कोळी मध्ये २४ वर्षे अखंड हरिनाम ज्ञानयज्ञ सोहळा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सुरू केले. श्री संत सेवा वारकरी संप्रदाय मंडळ परिसराच्या माध्यमातून अखंड हरिनाम सोहळा विठ्ठल रुक्मिणी मंदिर कोलीवली येथे हा सोहळा सुरू आहे.गेली २४ वर्षे कोळीवली गावी या साडे तीन दिवसांचे सोहळ्यात प्रवचन, हरिकीर्तन, भजन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, काकडा अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मधून वारकरी संप्रदाय घडत आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात पहाटेच्या काकड्याने झाली. त्यानंतर संत ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले. या सोहळ्यात हरीकीर्तन महादेव महाराज शिंदे देवाची आळंदी, जयश्रीताई घोरट देहनोली मुरबाड यांचे हरि कीर्तन होणार आहे

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

प्रति

**मा. सदस्य / सदस्या**

**पनवेल महानगरपालिका.**

**महोदय / महोदया,**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र. ०१, मंगळवार, दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर सभेसाठी नियुक्त केलेल्या पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, मा.जिल्हाधिकारी – ठाणे, यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी, सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, ही विंनती.

**विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०१, दिनांक १०/०२/२०२६**

**विषय पत्रिका**

**विषय क्रमांक**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ महापौर व उपमहापौर यामधील पोटकलम (१) अन्वये, महापालिका सदस्यांपैकी एका सदस्याची पनवेल महानगरपालिकेच्या ''महापौर'' पदासाठी अडीच वर्षे पदावधीकरिता निवड करणे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ महापौर व उपमहापौर यामधील पोटकलम (१) अन्वये, महापालिका सदस्यांपैकी एका सदस्याची पनवेल महानगरपालिकेच्या ''उपमहापौर'' पदासाठी अडीच वर्षे पदावधीकरिता निवड करणे.

मा. पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, ठाणे
यांचे मान्यतेने

**स्वाक्षरी/-**
नानासाहेब कामठे
महानगरपालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

**टिप :-** महाराष्ट्र शासन दिनांक २२/०१/२०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेचे महापौर पद हे नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित आहे.

**पनवेल महानगरपालिका**

**विशेष सभा क्र. ०१, मंगळवार, दिनांक १०/०२/२०२६ रोजी होणाऱ्या ''महापौर व उपमहापौर'' या पदासाठीचा निवडणुक कार्यक्रम**

| तारीख | निवडणुक कामाचा तपशिल |
|---|---|
| शुक्रवार, दि. ०६/०२/२०२६ | मा. महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही पालिका सदस्य विहित नमुन्यातील आपले नामनिर्देशन पत्र महापालिका सचिवांकडे सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत स्वतः समक्ष सादर करतील. |
| मंगळवार, दि. १०/०२/२०२६ महापौर व उपमहापौर पदाचे निवडणुकीसाठी विशेष सभा वेळ स. ११.०० वाजता | **प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यावर –** १. मा. महापौर पदासाठी महापालिका सचिवांकडे वरील दिवशी व वेळी प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशन पत्रे सभा सुरु झाल्यानंतर पीठासीन अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येतील. |
| | २. पीठासीन अधिकारी प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशन पत्राची छाननी करील व वैधपणे नामनिर्देशीत केलेल्या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखवील. |
| | ३. यथोचितरित्या नामनिर्देशीत केलेल्या पालिका सदस्यांची नावे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनीटांच्या आत एखाद्या उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याने सही केलेली लेखी नोटीस. पीठासीन अधिकाऱ्याकडे देऊन त्याची उमेदवारी त्याला मागे घेता येईल. |
| | ४. त्यानंतर महापौर पदाचे निवडीसाठी पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमाने घोषीत करील आणि हात वर करुन मतांची नोंद घेईल. ज्यांनी त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्तात नोंदवतील. त्याशिवाय ज्यांनी कोणतेही मत दिले नाही, अशा सदस्यांनी वेगळी नोंद घेईल. तद्नंतर, निवडणुक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषीत करुन पीठासीन अधिकारी निवडणुकीचा निकाल घोषीत करतील. **महापौर पदाचे निवडणुकीसाठी प्रक्रीया संपवून महापौर पदाच्या निवडीचा निकाल जाहिर केल्यानंतर –** वरील अ.क्र. १ ते ४ नुसार उपमहापौर पदाच्या निवडीसाठीची प्रक्रिया करुन उपमहापौर पदाच्या निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात येईल. |


**टिप :-** विहीत नमुन्यातील नामनिर्देशन पत्र व उमेदवारी मागे घेण्याचा विहित नमुन्यातील अर्ज महापालिका सचिव कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळी उपलब्ध आहे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३०/०१/२०२६.

**स्वाक्षरी/-**
**नानासाहेब कामठे**
महानगरपालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०१/१०/२५

## पं. दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेच्या अर्जांसंदर्भात आवाहन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या अनुसूचित जमातीच्या ज्या विद्यार्थ्यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना २०२५-२६ करीता नुतनीकरणाचे अर्ज सादर केलेले नाहीत, अशा पात्र विद्यार्थ्यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचे नुतनीकरणाचे अर्ज दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत http://swayam.mahaonline.gov.in/, या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावेत असे आवाहन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण तेजस्विनी गलांडे यांनी केले आहे.

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत नुतनीकरणास पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्यांच्या जागी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांची शासकीय वसतिगृहात गुणवत्ता यादीव्दारे निवड झालेली आहे व त्यांना वसतिगृहाकडून आवेदन पत्रे निर्गमित झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांनी वसतिगृहातच प्रवेश घ्यावा, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्वयंम योजनेत हस्तांतर करण्यात येणार नाहीत.

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**
**दरपत्रक**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.११/१६/२०२६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Optical Fiber केबल HDD (Horizontal Directional Drilling) व मायक्रोट्रेचिंग पद्धतीने टाकणे. | ३०/०१/२०२६ ते ०५/०२/२०२६ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ३०/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतः च्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmcbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०१/२०२६

**सही/-**
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

## अपर तहसिलदार कार्यालय पनवेल

दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड पिन: ४१०२०६
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ जन्म/ ७५२२७७८/२०२५

### ''नोटीस''

**विषय :-** उशिरा जन्म नोंद करणेबाबत.

**संदर्भ :-** अर्जदार श्री.नितेश धनाजी मोकल, यांचा दि. ०७/११/२०२५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. नितेश धनाजी मोकल, रा.मु.साई, पो.साई, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्यांचा स्वतःचा उशिरा जन्माचा नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २७/०२/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.३०/०१/२०२६

**सही/-**
**(जितेंद्र मा. इंगळे-पाटील)**
अपर तहसीलदार पनवेल

## नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/3901/PNL/97 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 C 9797 चे मालक **राजेश बाळू भगत** यांचे तारीख ०९/०६/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी गुना राजेश भगत, पत्ता : रा. हाऊस नं. ११३८, जेएनपीटी रोड, जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, सेक्टर २३,नौपाडा गाव, कळंबोली नोड, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - गुना राजेश भगत,**
पत्ता : रा. हाऊस नं. ११३८, जेएनपीटी रोड, जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, सेक्टर २३,नौपाडा गाव, कळंबोली नोड, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२१८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे खानाव, तहसील - पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे खानाव, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक (हे.आर.प्रती) | क्षेत्र: पोटखराबा (हे.आर.प्रती) | क्षेत्र: खाते क्र.४१५ एकुण क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ७९/५ | १ | ०-६५-५० | ०-०५-६० | ०-६०-१० | ११.८४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन २१ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३०/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

# ग्रामीण शिक्षणाची नवी पहाट

## बागेचीवाडी जि.प. शाळेचा कायापालट



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरानजीकच्या दुर्गम भागातील राजिप बागेचीवाडी शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संतोष शिंगाडे यांच्या विशेष पुढाकारातून मातृसेवा आणि रोटरीच्या मदतीतून शाळेला स्वच्छतागृह बांधण्यात आले.

रायगड जिल्हा परिषद बागेची वाडी हा आदिवासी दुर्गम भाग आहे .या भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी ठाण्यातील मातृसेवा फाऊंडेशन संस्थेने पुढाकार घेतला. रोटरी क्लब ऑफ ठाणे वेस्ट संस्थेमार्फत मिळालेल्या सहकार्याने शाळा पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला.

एक वर्षापूर्वी सरसाई भगत गणवेश वाटप करताना मातृसेवा संस्थेच्या अध्यक्षा संध्या सावंत ह्यांनी बागेची वाडी परिसरात भेट घेतली असता संतोष शिंगाडे यांनी शाळेच्या समस्या मांडल्या.

संस्थेच्या पाहणी दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक असली तरी स्वच्छतागृहांच्या अभावामुळे मुलींची उपस्थिती कमी असल्याचे निदर्शनास आले. या गंभीर समस्येची दखल घेत सर्वप्रथम दोन स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्यात आली त्यास फ्लॅगशिप कंपनीचा आधार मिळाला.

शाळेतील शिक्षकांनी इतर समस्या मांडल्या तेव्हा पिण्याच्या शुद्ध पाण्याचा अभाव, विद्यार्थ्यांसाठी खुर्च्या, संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर आदी शैक्षणिक साहित्याची गरज व्यक्त केली. या सर्व बाबींचा विचार करून मातृसेवा आणि रोटरी यांनी शाळेचा सर्वांगीण नूतनीकरण व सुसज्जीकरणाचा निर्णय घेतला. आदिवासी मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी फ्लॅगशिप कंपनीने त्यांच्या उड्ढ उपक्रमांतर्गत मोलाचे सहकार्य केले. यामुळे शाळेला आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत झाली आहे. नूतनीकरण केलेल्या शाळेचे उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. बोलक्या भिंतींमध्ये नव्या स्वरूपात सजलेली शाळा पाहून विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. शाळा प्रशासन आणि व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संतोष शिंगाडे यांनी सर्वांच्या कार्याची दखल घेत सन्मानचिन्ह देऊन गौरव केला.

हा उपक्रम केवळ शाळेचे उद्घाटन नसून सामाजिक जाणीव आणि एकत्रित प्रयत्नांतून आदिवासी भागात सकारात्मक बदल घडवता येतो याचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

# दारू न दिल्याने तळोजात दोन ठिकाणी हाणामारी, आरोपी फरार

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा वसाहतीत दारूच्या दुकानासमोर सलग दोन मारहाणीच्या घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दारू खरेदी अथवा पिण्यास नकार दिल्याच्या कारणावरून अनोळखी युवकांनी दोन तरुणांना बेदम मारहाण केल्याचे उघड झाले असून, या दोन्ही प्रकरणांची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेनंतर आरोपी युवक पसार झाले असून तळोजा पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. उघड्यावर मद्यपान करणारे व मद्यपींचा त्रास हा तळोजा परिसरातील रहिवाशांसाठी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न बनला आहे.

पहिल्या घटनेत तळोजा फेज-२ मधील कुणाल वाईन्ससमोर घडली. येथे ३० वर्षीय तरुण व त्याचा मित्र उभे असताना दोन अनोळखी युवकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपींनी ॲल्युमिनियमच्या पट्टीने डोक्यावर, पाठीवर आणि हातांवर जबर मारहाण केल्याने दोघेही जखमी झाले. याच दिवशी रात्री दुसरी घटना घडली. खारघर येथे राहणारा ३२ वर्षीय तरुण कुणाल वाईन्समधून दारू खरेदी करून घरी जात असताना दोन अनोळखी युवकांनी त्याला अडवले. '३० मिलीलीटर दारूचा पेग पाजणार नाही का?' अशी मागणी आरोपींनी केली. मात्र दारू देण्यास नकार दिल्याने त्यांनी लाथाबुक्यांनी त्याला मारहाण केली. या हल्ल्यात संबंधित तरुणाच्या बरगडी तुटल्या असून तो गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, या मारहाणीत आरोपींनी आपल्या हातातील सोन्याचे ब्रेसलेटही घेतल्याचा संशय पीडित तरुणाने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत व्यक्त केला आहे. दोन्ही घटनांचा तपास तळोजा पोलीस करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. वाढत्या मद्यपी त्रासावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

तळोजा वसाहतीमधील नागरिकरण झपाट्याने वाढत असून या परिसरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे सुरू करण्याची मागणी येथील रहिवाशांकडून होत आहे. नवी मुंबई पोलीस विभागाने पोलीस ठाण्यासाठी भूखंड मागणीचा प्रस्ताव सिडको मंडळाकडे दिला आहे. मात्र यासंदर्भात गतिमान पद्धतीने हालचाली होत नसल्याने पोलीस ठाणे सुरू करण्याचा प्रस्ताव बासनात पडून आहे.

# बाजार बंद ठेवून अजित पवारांना श्रद्धांजली



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व्यापाऱ्यांनी बाजार बंद ठेवले होते. त्यामुळे भाजीपाला आणि फळ बाजारातील व्यवहार पूर्णपणे ठप्प होते. त्यामुळे राजू शोकसागरात बुडालेले असताना प्रचंड वर्दळीची बाजारपेठ देखील दादांसाठी थांबली असेच काहीसे दृश्य पाहायला मिळाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बाजार घटकाशी जवळचे नाते होते. व्यापाऱ्यांबरोबरच माथाडी कामगारांचेही प्रश्न त्यांनी सोडवले होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने आपला एक जवळचा नेता हरपल्याची भावना बाजार घटकांनी व्यक्त केली आहे. बाजारातील अनेक वास्तूच्या उभारणी मध्ये त्यांचा संबंध राहिला आहे. बारामती पुणे येथील अनेक व्यापारी, माथाडी कामगार हे अजित पवार यांना मानणारे आहेत. त्यामुळे त्यांच्या जाण्याने आपला एक नेता हरवल्याची भावना या बाजार घटकांमध्ये आहे. त्यानुसार त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि शोक व्यक्त करण्यासाठी बाजार घटकांनी बाजार बंदची हाक दिली होती.. त्यानुसार गुरुवारी, भाजीपाला फळबाजार या दोन्ही बाजारातील व्यवहार पूर्णपणे ठप्प होते. कोणत्याही मालाची आवक जावक झाली नाही. कामगारांनी ही काम बंद ठेवून आपला शोक व्यक्त केला. अशी माहिती फळ बाजाराचे संचालक संजय पानसरे यांनी दिली.

मसाला, अन्न धान्य आणि कांदा बटाटा या बाजारातील व्यवहार बुधवारी दुपारनंतर रात्रीपर्यंत बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे गुरुवारी या बाजारातील व्यवहार काही प्रमाणात सुरू होते.

बाजारातील बरेच प्रश्न सोडवण्यासाठी अजित पवारांनी मदत केली होती. शिवाय आर्थिक तरतूद ही मिळून दिली होती. त्यांची ही मदत कायम स्मरणात राहील. अशी प्रतिक्रिया यावेळी मसाला बाजाराचे माजी संचालक कीर्ती राणा यांनी दिली आहे.

# उरण तालुक्यातील वनराईत आंबे मोहोरल्याने शेतकरी आनंदित


## रोग नियंत्रणासाठी झाडांवर फवारणी करण्याचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात यंदा थंडीच्या पोषक वातावरणामुळे आंब्याची वनराई योग्यतेने बहरली आहे. बहुतांशी वनराईत आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहर आला असून, काही ठिकाणी आंबे देखील लागल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उरण परिसरात भरघोस आंबा पिक येण्याचा अंदाज असल्याने येथील शेतकरी आनंदित झाला आहे.

तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात सर्वसामान्य ग्राहकांना आंब्याची चव चाखता येणार आहे. दरम्यान तालुक्यात यावर्षी सुरुवातीला काही भागात ढगाळ वातावरण व नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी तुरळक अवेळी पाऊस झाल्यामुळे आंब्याच्या झाडांवर विपरीत परिणाम झाला होता.

मात्र त्यानंतर आलेल्या थंडी आणि कोरड्या हवामानामुळे मोहर येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. कमी आद्रता व थंड वातावरण यामुळे मोहर धरायला अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणच्या आंबाबागेत मोहर स्पष्टपणे दिसून येत आहे. तर काही बागांमध्ये जानेवारीच्या सुरुवातीला बरसलेल्या पावसात मोहोर काळवंडून गेला. डिसेंबर अखेर व जानेवारीत थंडी वाढल्याने मोहर धरण्यास वातावरण अनुकूल झाल्याने, काही आंबा बागांमध्ये मोहर चांगलाच पकडला आहे. परंतु उरण तालुक्यातील चिरनेर,



कळंबुसरे, नागाव, केगाव, कोप्रोली, पाणदिवे, मोठेभोम, सारडे, वशेणी, पिरकोन, पाले, आवरे गोवठने विंधणे, दिघोडे, कंठवली यांच्यासह तालुक्यातील अन्य गावांमध्ये समाधानकारक आंब्याचे पीक आल्याचे पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांनी शेताच्या बांधावर माळरानात हापूस, केशर, रत्ना, राजापुरी, पायरी, चोथापुरी, दशहरी अशा सुधारित जातींची झाडे लावली आहेत. त्यामुळे कमी वेळेत मोठ्या प्रमाणात फळे येतात.

> तुडतुड्यांनी सोडलेल्या चिकट पदार्थामुळे काही आंबा बागांमध्ये काळी बुरशी आंब्याच्या मोहराला पकडली आहे. यासाठी आंब्याच्या झाडावर साध्या पाण्याने जोरात कारंजे मारून झाडावरील आंबा मोहोरावरील चिकटा धुवून घ्यावा. त्यानंतर बुरशीनाशक औषधांची फवारणी करावी. ही फवारणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी करावी.
>
> **–सुषमा गायकवाड,** कृषी सहाय्यक अधिकारी, उरण

> ऊन, वारा अशा समतोल वातावरणामुळे उरण परिसरात मोठ्या प्रमाणात आंब्यांना मोहोर आला आहे. काही ठिकाणी आंबे देखील आले आहेत. सध्याचे वातावरण आंबा शेवगा पिकाला अत्यंत उपयुक्त असल्यामुळे उरण परिसरात आंब्याचे चांगले पीक आले आहे. अजून मोहर बाहेर येत आहे. त्यामुळे आंबा बागायतदारांनी कीटकनाशक फवारणी करणे आवश्यक आहे.
>
> **–अस्मित ठाकूर,** शेतकरी, चिरनेर

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने मोहोपाड्यात सर्वपक्षीय शोकसभा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजितदादा पवार यांचे बारामतीत विमान अपघातात निधन झाले. या अपघाताच्या बातमीने राज्यात शोकानहर निर्माण झाली. कार्यकर्त्यांपासून नेत्यांपर्यंत सर्वांचाच बांध फुटला. राजकारणातील दादा माणूस म्हणून ओळख असलेले तडफदार आणि झंझावाती नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले....या घटनेने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे.

रसायनी मोहोपाडा विभागात ही बातमी पसरताच सर्वांनी दुःख व्यक्त केले. या घटनेची माहिती मिळताच वासांबे विभागातील सर्व पक्षीयांनी मोहोपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे जमून गुरुवार, २९ रोजी सकाळी अभिवादन व शोकसभेचे आयोजन केले होते.

या वेळी व्यापारी असोसिएशनने मोहोपाडा बाजारपेठ बंद ठेवली होती. मान्यवर सर्वपक्षीय नेत्यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने शोक व्यक्त केला व त्यांना अभिवादन केले.

या वेळी वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमाताई मुंढे यांनी सांगितले की, दादांच्या जाण्याने संपूर्ण ज्ञान असणारा नेता हरपला आहे. दादांची प्रशासनावर जबर पकड होती. शेतकरी, क्रिडा, सांस्कृतिक कामात दादांचे योगदान होते. दादा काम करत असताना वेळेचे भान ठेवा व ते काम वेळेतच पूर्ण करा असे कार्यकर्त्यांना नेहमीच सांगत असत. माणगाव येथील विकासकामाच्या कार्यक्रमात तटकरेसाहेबांच्या माध्यमातून माझे छोटेसे सामाजिक काम होते. दादांनी तात्काळ कमिशनर यांना फोन लावून ते काम मार्गी लावले. जनमाणसात समाजकारण कसे करावे, हे दादांकडून शिकावे. संविधानाने दिलेल्या कायद्याच्या चौकटीत राहून काम करा असे त्यांचे सांगणे होते. त्यांच्या जाण्याने मन सुन्न झाले आहे.

यावेळी माजी सरपंच कृष्णा पारंगे, संदीप मुंढे, रोशन राऊत, ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे, सदस्या प्रतिक्षा राऊत, मयुरा गोपाळे, वेदीका पाटील, प्रतीक्षा खाने तसेच निखिल डवळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहतूक शाखेकडून मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर व नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक पोलीस तसेच स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांच्यासाठी विशेष वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संस्था व डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल यांच्या सौजन्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरामध्ये एकूण ३६ वाहतूक पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच ६५ स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, दृष्टी तपासणी, हृदयविकारासंबंधी प्राथमिक चाचण्या तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. गरजेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांनी योग्य वैद्यकीय सल्ला देत मोफत औषधांचे वितरणही केले. विशेषतः स्कूल बस चालक, वाहक व बस मालक यांची वैद्यकीय तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. दृष्टीदोष, उच्च रक्तदाब, मधुमेह, थकवा किंवा अचानक उद्भवणारे आरोग्याचे त्रास हे अनेक



अपघातांचे कारण ठरू शकतात.

लहान विद्यार्थ्यांची वाहतूक ही अत्यंत जबाबदारीची बाब असल्याने चालकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सक्षम असणे आवश्यक आहे. बस मालकांची तपासणी केल्यामुळे वाहन व्यवस्थापन, सततचा ताण, दीर्घ कामाचे तास यांचा आरोग्यावर होणारा परिणामही वेळेत लक्षात येतो. त्यामुळे हे शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता अपघात प्रतिबंध, शालेय वाहतुकीची सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारीचे भान निर्माण करणारे ठरले.

वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी रस्त्यावर सातत्याने कर्तव्य बजावत असतात. उन्हाळा, पाऊस, वाहतूक कोंडी अशा प्रतिकूल परिस्थितीत काम करताना त्यांच्या आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे पोलीस कर्मचारी व अधिकारी वर्गासाठी अशा शिबिरांचे आयोजन कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या संपूर्ण शिबिराचे नियोजन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, सहाय्यक फौजदार किशोर लाड, तसेच पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम व ज्ञानेश्वर वाघ यांनी अत्यंत शिस्तबद्ध व सुयोग्य पद्धतीने केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी वाहतूक शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता व समन्वय उल्लेखनीय ठरला. तसेच, सामाजिक बांधिलकी जपत सहकार्य करणाऱ्या भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संस्था आणि डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाचे योगदान मोलाचे असल्याचे यावेळी आवर्जून नमूद करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे रस्ते सुरक्षा अधिक बळकट होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

समाजातील प्रश्नांवर फक्त भूमिका न मांडता प्रत्यक्ष कृतीतून बदल घडविणारे उदयोन्मुख नेतृत्व म्हणून अतुल दत्तात्रेय मालकर यांना ओळखले जाते. यांनी सामाजिक, शैक्षणिक व आदिवासी विकासासाठी कार्य करत विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. याच सेवाभावातून त्यांनी आपला वाढदिवस समाजकार्यास समर्पित केला.

वाढदिवसानिमित्त रसायनी पाताळगंगा परिसरातील राजिप मराठी शाळा, तळवली येथे आयोजित कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी तसेच दहावी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मकता व नेतृत्वगुण विकसित व्हावेत, हा या उपक्रमामागील स्पष्ट उद्देश होता.याचवेळी आदिवासी बांधवांच्या मूलभूत व प्रलंबित समस्यांकडे थेट लक्ष देत अनेक गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड प्रत्यक्ष मिळवून देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष लाभ देणारे कार्य हीच त्यांच्या नेतृत्वशैलीची खरी ओळख ठरत आहे.

# युवकांसाठी करिअर मार्गदर्शन संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

सोपे शब्द, सुटसुटीत वाक्य, बिनचूक रचना, मोजकी मांडणी व स्पष्ट विचार ही शासकीय सुलेखनाची पंचसूत्री असून मराठी भाषेतील अभिजातता वृध्दिंगत करण्यामध्ये शासकीय मराठी लेखनाचाही महत्वाचा भाग असल्याचे मत सुप्रसिध्द लेखक व शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे निवृत्त संचालक सुरेश वांदिले यांनी व्यक्त केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या 'कार्यालयीन मराठी लेखन आणि मराठी युवकांसाठी करिअरच्या संधी' या विषयावरील व्याख्यानाप्रसंगी त्यांनी आपले विचार मांडले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, परिमंडळ २ चे उपआयुक्त संजय शिंदे, मुख्य विधी अधिकारी अभय जाधव, कार्यकारी अभियंता प्रविण गाडे, सहा.आयुक्त अरुण पाटील तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक व युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर लगेचच भाषा संचालनालयाची स्थापना झाली आणि मराठी भाषेतून शासन व्यवहार सुरु झाला. शासकीय मराठी उत्तम रितीने बोलली व लिहिली जावी यादृष्टीने शासन व्यवहार कोश प्रसिध्द करण्यात आला. या कोशासह प्रशासनिक लेखन, मराठी लेखन मार्गदर्शिका अशी मराठी शब्दभांडार वाढविणारी व त्याचा लेखनात उपयोग करण्यासाठी लाभदायी ठरणारी पुस्तके प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या वाचनात व संग्रहात असायलाच हवीत असे आग्रही मत सुरेश वांदिले यांनी मांडले.




आपल्या बोलीचा प्रभाव आपल्या लिखाणावर पडतो, त्यामुळे आपण लिहीलेले जास्तीत जास्त लोकांना समजावे यासाठी प्रमाण भाषेत लिहीले जावे असेही ते म्हणाले. पुस्तके वाचली नाहीत तरी किमान वर्तमानपत्राचे संपादकीय तरी वाचावे, त्यामुळे भाषा समृध्द होईल. ही नियमित सवय लावून आपला व्यासंग वाढवावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'भाषिणी' या केंद्र सरकारने विकसीत केलेल्या विशेष पमध्ये ३७ भाषांचा समावेश असून त्यामध्ये मराठीसह २२ भारतीय भाषा आहेत अशी माहिती देत २०२५ च्या भाषा धोरणातील महत्वाच्या बाबींविषयी त्यांनी भाष्य केले.

याशिवाय पारंपारिक शिक्षण क्षेत्रांच्या पलिकडे जाऊन आगामी १०-१५ वर्षात चांगली संधी देणारे योग प्रशिक्षण, वेडींग प्लॅनर, इव्हेंन्ट मॅनेजमेंट, मानसोपचार तज्ज्ञ, सायबर तज्ज्ञ अशा आजच्या जगाशी सुसंगत अनेक व्यवसाय क्षेत्रे आहेत त्याकडे डोळे उघडे ठेवून पाहिले पाहिजे असेही ते म्हणाले. मराठी युवकांमध्ये व पालकांमध्ये चौकटीबाहेर जाऊन शिक्षण घेण्याची व रोजगाराची मानसिकता दिसून येत नाही. या चौकटी ओलांडून मोठया संधी उपलब्ध आहेत त्यांचा लाभ घेण्याकडे मराठी तरुणांनी विशेष लक्ष दयावे असेही आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला याचा आनंद व अभिमान बाळगताना मराठी वाचविण्याकडे असलेली आपली मानसिकता बदलून मराठी वाढविण्याकडे विशेष लक्ष दयावे असे आवाहन केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडयातील पुढील कार्यक्रम मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा. मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न होत असून यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात 'वाचनकट्टा' ही अभिनव संकल्पना शाळा-महाविद्यालयांत राबवून नव्या पिढीत वाचन प्रेरणा निर्माण करणारे 'वाचनकट्टा' या अभिनव संकल्पनेचे संस्थापक युवराज कदम 'वाचाल तर वाचाल' या विषयावर शिक्षक, पालक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी नागरिक यांच्याशी संवाद साधणार आहेत. तरी नवी मुंबईकर साहित्यप्रेमी नागरिकांनी या विनामूल्य प्रवेश असलेल्या कार्यक्रमाप्रसंगी मोठया संख्येने उपस्थित राहून हा उपक्रम यशस्वी करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली

**रोहा : प्रतिनिधी**

विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार व विमानात असलेल्या सहप्रवाशांना रोहा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शहरातील राम मारुती चौक येथे श्रद्धांजली वाहण्यात आली.




या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, नगरसेवक अजित मोरे, प्रशांत कडू, रोशन चाफेकर, पूर्वा मोहिते, गौरी बारटक्के, प्रियंका धनावडे, सुप्रिया जाधव, संजना शिंदे, माज सवाल, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, समीर शेडगे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, प्राजक्ता चव्हाण, समिर सकपाळ, रामाशेठ म्हात्रे, जितेंद्र पडवळ, मजिद पठाण, जालिंदर शेवाळे, वसंत कोठारी, सुनील कोठारी, ॲड.मयुरा मोरे, नितीन पिंपळे, नवनीत डोलकर, विलास गुजर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.




**माणगाव : प्रतिनिधी**

राजकारणात तडफदारपणा, निर्णयक्षमता आणि विकासाचा स्पष्ट अजेंडा घेऊन महाराष्ट्राला दिशा देणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आठवणींना केवळ अश्रूंनी नाही, तर संघर्षातून मिळवलेल्या विजयानेच खरी श्रद्धांजली देता येईल, असे भावनिक आवाहन निजामपूर जिल्हा परिषद मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार ॲड. राजीव साबळे यांनी केले. पक्षाच्या निजामपूर येथील कार्यालयात पार पडलेल्या श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.

अजितदादा हे सत्तेच्या खुर्चीवर बसणारे नेते नव्हते, तर रस्त्यावरच्या कार्यकर्त्यांचा आवाज होते. संकटात खंबीर उभे राहणारे, अन्यायाविरुद्ध न झुकणारे आणि विकासासाठी कोणाशीही दोन हात करण्याची तयारी ठेवणारे नेतृत्व म्हणजे अजितदादा पवार, असे म्हणत ॲड. साबळे यांनी भारावून टाकले. ते पुढे म्हणाले, अजितदादांचे विचार जिवंत ठेवायचे असतील, तर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादीला अभूतपूर्व ताकद देणे हाच एकमेव मार्ग आहे. निजामपूर मतदारसंघातून राष्ट्रवादीचा उमेदवार विजयी झाल्यास तो केवळ एक राजकीय विजय नसेल, तर तो कार्यकर्त्यांच्या घामाचा, जनतेच्या विश्वासाचा आणि अजितदादांच्या विचारांचा विजय असेल.

या श्रद्धांजली सभेस पंचायत समिती उमेदवार संजोग मानकर आणि गणेश पवार, संघटक बाबूशेट खानविलकर, विभागीय अध्यक्ष तुकाराम सुतार, योगेश निजापकर, शिवाजी घाग, पाबेकर ताई आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी सभास्थळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत अश्रू, तर हातात झेंडे होते. 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.




**खोपोली : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ फेब्रुवारी रोजी विमान अपघातात दुर्दैवी व दुःखद निधन झाले. गुरुवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. याच दिवशी सायंकाळी ५ वाजता खोपोली शहरातील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, संघटना यांच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

महाराजा मंगल कार्यालयात झालेल्या श्रद्धांजली कार्यक्रमास राष्ट्रवादीचे नेते व माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, सुनील पाटील, नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, राष्ट्रवादीच्या अश्विनी पाटील, सुरेखा खेडकर, काँग्रेसचे उल्हास देशमुख, शिवसेनेचे मोहन औसरमल, वंचित बहुजन महासंघाचे दीपक गायकवाड, हास्य क्लब संस्थापक बाबुभाई ओसवाल, माजी नगरसेवक मोहन अवसरमल यांच्यासह विविध पक्ष व संस्था-संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी दिवंगत अजित पवार यांच्या अशा अचानक जाण्याने दुःख व्यक्त केले.

# खालापुरात भाजप महायुतीला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व खालापूर पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आत्करगाव जिल्हा परिषद गट तसेच आत्करगाव व खानाव पंचायत समिती गणामध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.



आत्करगाव जिल्हा परिषद गटातून सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या रेश्मा राजेश पाटील यांना जिल्हा परिषद माजी सभापती नरेश पाटील यांचा आशीर्वाद आहे. नरेश पाटील हे या गटातून जिल्हा परिषदेचे माजी सभापती तसेच खालापूर पंचायत समितीतही सभापती असताना मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली आहेत. ही रेश्मा पाटील यांच्यासाठी जमेची बाजू ठरेल, अशी चर्चा आहे.

नरेश पाटील यांनी केलेल्या कामाच्या जोरावर माझ्यासहित दोन्ही गणातील उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा रेश्मा पाटील यांना विश्वास आहे.

खानाव पंचायत गणातील उमेदवार भाई शिंदे हे रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष असून त्यांनीही खानाव परिसरात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केल्याचे सांगण्यात येत आहे, तर आत्करगाव पंचायत समिती गणातून रोहिणी एरम या सामाजिक कार्यकर्त्या उभ्या असून या भागातील एरंबुवा यांनी केलेल्या कामाच्या जोरावर त्यांना पाठबळ मिळेल असे बोलले जात आहे.

दरम्यान विरोधकाकडे कुठलाही विकासाचा मुद्दा नसल्याने त्यांनी महायुतीच्या उमेदवाराचा अप्रचार करण्याची मोहीम उघडली आहे. महायुतीच्या उमेदवारांनी विचलित न होता मतदारांची जनसंपर्क वाढवून कार्यकर्त्यांनी आपला प्रचार सुरूच ठेवाम असा सल्ला भाई शिंदे यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे.

खालापूर तालुक्यात महायुतीच्या उमेदवारांचा बोलबाला असल्याने कार्यकर्त्यांनी गाव बैठका; त्याचप्रमाणे घरोघरी जाऊन महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा, असे एका बैठकीत जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले.

# माणगाव येथे रस्ता सुरक्षा अभियान; वाहनचालकांना मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ठिकठिकाणी रस्ता सुरक्षा अभियानाद्वारे वाहनचालक मालकांना मार्गदर्शनासाठी शिबिरे घेण्यात आली. असेच एक शिबिर माणगाव शहरात गुरुवारी (दि.२९) झाले.

या वेळी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार - वाहन निरीक्षक सूर्यकांत गंभीर यांनी वाहन चालक-मालक यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रस्ता सुरक्षा अभियान म्हणजे समाजाच्या सुरक्षेचे अभियान असून वाहन चालविताना प्रत्येक चालकाने स्वतःची, इतर वाहनचालकांची तसेच रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या जीवाची काळजी घेतली पाहिजे. वाहन चालकाने आपली घरी कुणीतरी वाट पाहत आहे याची जाणीव ठेवून वाहन चालवावे. महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून अनेक निष्पाप जीवांचा यात बळी जातो. प्रत्येकाने वाहनांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास अपघातास आळा बसू शकतो.

आईच्या पोटातून जन्माला आल्यापासून ते शेवटी शवपेटीपर्यंत माणसाचा वाहनाशी संबंध जोडला जातो. वाहनचालकांनी आपला जीव धोक्यात घालून वाहन चालविले नाही, तर अपघातांचे प्रमाण कमी होईल. त्याचप्रमाणे प्रत्येक वाहनचालकाने आपल्या वाहनांची कागदपत्रे तसेच आपले वाहन सुस्थितीत आहे कि नाही याची खात्री करूनच वाहन चालविले पाहिजे. मोटरसायकलस्वारांनी डोक्यात हेल्मेट घालूनच वाहन चालवावे, तर चारचाकी वाहनचालकांनी सीट बेल्ट लावूनच वाहन चालवावे.

माणगाव शहरात आरटीओ कॅम्प वाहन चालकांना मार्गदर्शन करताना मोटार वाहन निरीक्षक किरण लोंढे यांनी सांगितले की, पालकांनी लहान मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये. चालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास रस्त्यावरील अपघात कमी होतील तसेच वाहन चालविताना योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

या शिबिरात माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील डॉ.श्रेयश कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी ९६ वाहन चालकांची नेत्र तपासणी तसेच ९६ वाहन चालकांची आरोग्य तपासणी केली.

उपक्रमात उपप्रादेशिक कार्यालयाचे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक गुलाब सोळंकी, अक्षय तुपसमुद्रे, विशाल जाधव यांनी सहभाग घेतला. शिबिरास मोटार प्रशिक्षण स्कूलचे अभिजित पत्की, सुभाष कदम, विनय होमकर, हेमंत जोशी, बंधू भोनकर, मनोज गांधी, येलवे, गजगे आदी उपस्थित होते.

# माणगाव ग्रामीण सहकारी पतसंस्थेचा उद्या वर्धापन दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, उतेखोल या संस्थेचा २७वा वर्धापन दिन सोहळा रविवार, १ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा आणि महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

सर्वांनी सहकुटूंब, सहपरिवार, आतेष्ट व मित्रमंडळीसह उपस्थित राहून सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा तसेच महिलांनी मोठ्या संख्येने हळदी-कुंकू समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक ॲड.राजीव साबळे, चेअरमन आनंद यादव, व्हाईस चेअरमन मदनलाल जैन, सर्व संचालक, व्यवस्थापक, कर्मचारीवृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी केली आहे.

# शाळा, शिक्षकांचा बोर्ली येथे सन्मान

**मुरूड : प्रतिनिधी**

विनोबा ॲप उपक्रमांतर्गत एफएलएन चाचणी आणि इतर शैक्षणिक प्रगतीमध्ये अव्वल स्थान प्राप्त करणाऱ्या शाळा तसेच शिक्षकांचा सेंट्रल स्कूल बोर्ली येथे भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा प्रोजेक्ट ऑफिसर वैभव शिर्के यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. त्यांनी उपस्थितांना विनोबा ॲपसंदर्भात मार्गदर्शन केले. एफएलएन चाचणी किंवा ॲपद्वारे घेण्यात येणाऱ्या इतर चाचणीसाठी अधिक मेहनत घ्या व शाळेत घेत असलेल्या उपक्रमांचे व्हिडीओ, फोटो ॲपमध्ये रूपांतरित करण्याचे त्यांनी सूचित केले.

या वेळी मुरुड तालुक्यातील चोरढे, ताडगाव, वेताळवाडी शाळांचा सन्मान करण्यात आला तसेच या शाळांचे शिक्षक संगीता भगत, रूपाली ठाकूर, अनंत माळी यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बोर्ली केंद्रप्रमुख निलेश वारगे, साधन व्यक्ती महेश भगत, केंद्र प्रमुख गालिब जनाब, विश्वनाथ म्हात्रे, सुनील काळे, पुकळे, चेतन पाटील यांचे सहकार्य लाभले. नियोजन सेंट्रल स्कूल बोर्लीच्या मुख्याध्यापिका स्मिता कवळे, शरद पाटील यांनी केले होते. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# मेहेंदळे हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथील मेहेंदळे हायस्कूलमधील १९७६-७७ दहावीच्या बॅचचे चौथे गेट टुगेदर तांबडी येथील नक्षत्र फॉर्म हाऊसवर नुकतेच झाले. त्यामध्ये २५ मित्र-मैत्रिणी हजर होते. दोन दिवसीय गेट टुगेदरमध्ये जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.



मित्र-मैत्रिणींनी त्यांच्या सध्याच्या कौटुंबिक जीवनाची माहिती दिली. शालेय आठवणीना उजाळा देते वेळी बरेचजण भावूक झाले होते. या गेट टुगेदरचे नियोजन नितीन परब, प्रफुल ताम्हाणे, मनोज शहा व नंदकुमार भादेकर यांनी केले होते, तर रवींद्र साठे, डोंबिवली यांनी वारंवार प्रोत्साहन देऊन पाठपुरावा केला.

या गेट टुगेदरला श्री. व सौ. रवींद्र साठे, श्री. व सौ. वसंत रानडे, रजनी मेहता डोबिंवली, श्री. व सौ. अनिल कुलकर्णी पुणे, सौ. व श्री. कुंदा शेठ महाड, सौ. व श्री. सुवर्णा भावे जोशी चिपळूण, संजय भिडे माणगाव तसेच रोहा येथून सौ. व श्री. नितीन परब, सौ. व श्री. प्रफुल ताम्हाणे, नंदकुमार भादेकर, अजिता शहासने-घोडिंदे, परेश दामाणी, प्रशांत साळुंखे, मंगेश जोशी यांनी उपस्थित राहून धमाल केली. पुढील गेट टुगेदर वीणा काळे-करंदीकर, पौड फाटा, पुणे येथे नोव्हेंबरमध्ये करण्याचे ठरले.



(छाया : अमेय नाझरे)

**श्रीवर्धन : येथील नयनरम्य समुद्र किनारा पर्यटकांना साद घालत आहे.**


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर ई-निविदा सूचना**
कालावधी - ३ वर्षे

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१३/१८/२०२६

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार व पुनर्वसन सेवा राबविण्याकरीता सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या तीन वर्षाकरिता जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करून दर निश्चित करणेबाबत या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक : ३०/०१/२०२६

**सही/-**
**गणेश शेटे**
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका


# अष्टमी मुस्लिम समाज अध्यक्षपदी जमीर कर्जिकर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहारातील अष्टमी मुस्लिम समाज अध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जमीर अहमद कर्जिकर, उपाध्यक्षपदी मुशीर अहमद दर्जी तसेच अरबी कमिटी अध्यक्षपदी मुबीन उमर दळवी यांची निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष शफी पानसरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जामे मस्जिद अष्टमीच्या हॉलमध्ये सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. हाफिज म्हैसकर यांनी कुराण पठण करुन सभेची सुरुवात केली. सचिव राहील नागोठकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मागील इतिवृत वाचून ते सर्वानुमते कायम करण्यात आले. मावळते अध्यक्ष पानसरे यांनी मागील पाच वर्षात केलेल्या विकासकामांची उपस्थितीत ग्रामस्थांना माहिती दिली. या कमिटीने प्रचंड विकासकामे केल्याने जमलेल्या ग्रामस्थांनी कार्यकारी मंडळाचे कौतुक केले.



यानंतर जुन्या कमिटीचा कार्यकाळ संपल्यामुळे नवीन कमिटी गठीत करण्याचे ठरले. याकरिता अरिफ पठाण, शाहिद धनसे, हनिफ दर्जी या तिघांची निवडणूक निर्णय समिती तयार करण्यात आली. १७ जागांसाठी २५ जण इच्छुक असल्यामुळे धार्मिक स्थळात राजकारण नको म्हणून चिठ्ठ्या उडवून यात १७ जणांची कार्यकारी मंडळ सदस्यपदी निवड करण्यात आली. निवडून आलेल्या १७ जणांमध्ये केलेल्या अंतर्गत गुप्त मतदानात अध्यक्षपदी ११ वर्षापूर्वी अध्यक्षपद भूषविणारे जमीर कर्जिकर यांनी पुन्हा एकदा पुढील पाच वर्षाकरिता बहुमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

उपाध्यक्षपदी मुशीर दर्जी तसेच अरबी कमिटी अध्यक्षपदी मुबीन दळवी, सचिवपदी राहील करिम नागोठकर, सहसचिवपदी समीर इब्राहिम चोरडेकर, खजिनदारपदी यासीन अल्लीमिया पानसरे तसेच सदस्यपदी बाकर महमद साष्टीकर, शाहानवाज उमर नागोठकर, मजीद अयुब पठाण, डॉ.अरबाज बशीर खान, सूफयान म.शफी पानसरे, अकील अ.रहिमान फौजे, मुखत्यार हुसेनमिया शेटे, साजिद शरफूद्दीन किरकिरे, रहीम अजीम दापोलकर, मारुफ मोअझम कबले व सऊद अ.कादीर बंद्री यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष कर्जिकर यांनी उपस्थितीत ग्रामस्थांचे आभार मानले.

## महामार्गावर ट्रक उलटून वाहतूक ठप्प

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर लोणावळ्याकडे जात असताना बॅटरी हिलजवळ एक ट्रक शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ८.३० अनियंत्रीत झाल्याने विरुद्ध बाजूला गेला आणि एका बाजूला कलंडला.

या अपघातामुळे बॅटरी हिलजवळ महामार्गाच्या दोन्ही लेन ठप्प झाल्या. दरम्यान, काही बेशिस्त वाहनचालकांमुळे संपूर्ण मार्ग ब्लॉक झाला.


**MAHAVITARAN — TENDER NOTICE**

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission |
| --- | --- | --- |
| SE/PC/T/ BM Substation / T-07/ 2025-26 | *Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Pen Circle Bhandup Zone* | Sale Date;- Dt.30/01/2026 To Dt.09/02/2026 up to 17.00 Hrs. Bid Submission Dt. 09/02/2026 upto 22:00 Hrs. |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

PRO NO - 011 Sd/-
SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

# अल्कराजची फायनलमध्ये धडक



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलमध्ये स्पेनचा युवा कार्लोस अल्कराज आणि अनुभवी जर्मन स्टार अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांच्यात काँटे की टक्कर पहायला मिळाली. टेनिस जगतातील अव्वल मानांकित कार्लोस अल्कराज याने थरारक आणि ऐतिहासिक पुनरागमन करत झ्वेरेव्हचा पराभव केला. तब्बल पाच तास २७ मिनिटे चाललेल्या या मॅरेथॉन लढतीत अल्कराजने ६-४, ७-६(५), ६-७(३), ६-७(४), ७-५ असा विजय मिळवत फायनल गाठली.

या सामन्यात अल्कराजला तीव्र क्रॅम्प्स आणि दुखापतीचा सामना करावा लागला. सामन्यादरम्यान त्याने उपचार घेतले, इतकेच नव्हे तर पिकल ज्यूसचीही मागणी केली होती. जवळपास साडेपाच तास चाललेल्या लढतीत जाणवणारा शारीरिक थकवा आणि वेदना सहन करत सामना हातून निसटतोय असे वाटत असताना अफलातून जिद्दीने खेळत त्याने आपले अधिराज्य कायम राखले.

### ऑस्ट्रेलियन ओपन

सामन्यादरम्यान तिसऱ्या सेटमध्ये ४-४ अशी बरोबरी असताना वाद पाहायला मिळाला. अल्काराझला दुखापतीतून सावरण्यासाठी पंचांनी जादा वेळ दिला, ज्यावर झ्वेरेव्हने तीव्र संताप व्यक्त केला. नेटवरील पंच मारियाना वेल्जोविक यांच्याशी वाद घालताना झ्वेरेव्हचा संयम सुटला आणि त्याने अपशब्दांचा वापर करत आपला राग व्यक्त केला.

> *माझ्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील हा सर्वात कठीण सामना होता. तिसऱ्या सेटमध्ये मी शारीरिकदृष्ट्या खूप संघर्ष करत होतो, पण स्वतःवर विश्वास असणे सर्वात महत्त्वाचे असते.*
>
> **–कार्लोस अल्काराझ**

ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलमध्ये यानिक सिनर (सलग दोन वेळा विजेता) आणि नोव्हाक जोकोविच (मेलबर्नचा १० वेळचा बादशहा) यांच्यात रंगणार आहे. या दोघांमधील विजेता फायनलमध्ये अल्कराजला भिडेल. अवघ्या २२व्या वर्षी अल्कराज करिअर ग्रँड स्लॅम पूर्ण करणारा इतिहासातील सर्वात तरुण पुरुष टेनिसपटू ठरण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेतील जेतेपदासह तो महान टेनिसपटू राफेल नदाललाही मागे टाकू शकतो. यंदाच्या वर्षातील पहिल्या वहिल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत तो हा इतिहास रचणार का? ते पाहण्याजोगे असेल.

## नवी मुंबईतील ७० वर्षीय उत्तम मानेंनी राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा गाजवली

### तीन सुवर्ण आणि चार रौप्यपदकांची कमाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र मास्टर्स गेम्स आयोजित युनायटेड राष्ट्रीय स्पर्धा नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये नुकतीच झाली. या स्पर्धेत ॲथलेटिक्स बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कबड्डी, रायफल शुटींग, डार्ट, योगासन, इत्यादी स्पर्धांमध्ये संपूर्ण भारतातील सुमारे १२८० खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेत नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिक उत्तम माने यांनी पुरूषांच्या ७०+ वयोगटातील स्पर्धेत तरुणांना लाजवेल अशी कामगिरी केली आहे.

माने यांनी या स्पर्धेत तीन सुवर्ण आणि चार रौप्य अशी एकूण सात पदके पटकावित घवघवीत यश संपादन केले. यात १० मी. शूटिंग स्पर्धा, डार्ट स्पर्धा, थाळीफेक या तीन खेळांमध्ये त्यांनी सुवर्णपदक जिंकले, तर लांब उडी, हातोडाफेक, ४x१०० मिक्स रिले, ४x१०० मी. रिले या खेळात चार रौप्यपदकांची कमाई केली.

सानपाडा येथे राहणार उत्तम माने यांनी आजपर्यंत ६१ सुवर्ण, ५९ रौप्य आणि ३३ कांस्य अशी एकूण १५३ पदके जिंकली आहेत. ताज्या कामगिरीबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## वरिष्ठ महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ उपउपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**


महाराष्ट्राच्या महिला संघाने ७२व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत उपउपांत्य फेरी गाठली. तेलंगणा येथील गची बोवली बंदिस्त क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राने गोवा संघाला ४२-३६ असे नमविले.

सुरुवातीला दोन्ही संघांमध्ये थोडी झटपट पहावयास मिळाली, पण पहिला लोण देत महाराष्ट्राने १९-१० अशी आघाडी घेतली. विश्रांतीला महाराष्ट्राकडे २५-१४ अशी आघाडी होती. विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत महाराष्ट्राने आपली आघाडी ३२-१५ अशी वाढविली. यानंतर गोव्याने गतिमान खेळ करीत महाराष्ट्रावर लोण देत ३०-४० अशी आघाडी कमी केली. शेवटी महाराष्ट्राने सहा गुणांनी बाजी मारली. आम्रपाली गलांडे, याशिका पूजारी, निकिता पडवळ याच्या दमदार चढाया त्यांना समृद्धी मोहिते, समरीन बुरोंडकर, ज्यूली मिस्कीटा यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे महाराष्ट्राने हा विजय मिळविला.

महाराष्ट्राचा या स्पर्धेत ई गटात समावेश होता. त्या गटात छत्तीसगड, विदर्भ व केरळ हे अन्य संघ होते. महाराष्ट्राने प्रथम विदर्भला ५७-२० असे, त्या नंतरछत्तीसगडला ४२-१९ असे, तर शेवटी केरळला ५७-११ असे पराभूत करीत या गटात अव्वल स्थान मिळविले.

## बंगळुरूचा यूपीवर दमदार विजय

### ग्रेस हॅरिसची अष्टपैलू कामगिरी



**वडोदरा : वृत्तसंस्था**

ग्रेस हॅरिसची शानदार अष्टपैलू कामगिरी, कर्णधार स्मृती मानधना हिचे अर्धशतक आणि नादिन डी क्लार्कच्या प्रभावी गोलंदाजींच्या जोरावर बंगळुरू संघाने डब्लूपीएलमध्ये गुरुवारी यूपीवर आठ बळी आणि ४१ चेंडू राखून दमदार विजय मिळवला.

यूपीला २० षटकांत ८ बाद १४३ धावांवर रोखल्यानंतर बंगळुरूने १३.१ षटकांत दोन बाद १४७ धावा करत विजय साकारला. विजयासाठी १४४ धावांचा पाठलाग करताना बंगळुरूकडून हॅरिस आणि मानधना यांनी ५५ चेंडूंत १०८ धावांची सलामी देत विजय रचला. शिखाने हॅरिसचा त्रिफळा उडवला. स्मृतीने जॉर्जिया व्होल (१६) हिच्यासोबत ३५ धावा जोडत विजय निश्चित केला. स्मृतीने २७ चेंडूंत आठ चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ५४ धावा केल्या. यूपीकडून शिखा पांडे आणि आशा सोभना यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

याआधी बंगळुरूने फलंदाजीने निमंत्रण दिल्यानंतर मेग लॅनिंग आणि दीप्ती शर्मा यांनी ८.१ षटकांत ७४ धावांची सलामी देत यूपीला चांगली सुरुवात करून दिली. नादिन डी क्लार्कने लॅनिंगला बाद करत ही जोडी फोडली. लॅनिंगने ३० चेंडूंत सहा चौकार व एका षटकारासह ४१ धावा केल्या. त्यानंतर मे जोन्स (१), हरलीन देओल (१४), क्लोई ट्रायोन (६), श्वेता सेहरावत (७) ही मधली फळी पूर्णपणे कोलमडली.

संक्षिप्त धावफलक : यूपी : २० षटकांत ८ बाद १४३ धावा (दीप्ती शर्मा ५५, मेग लॅनिंग ४१) गोलंदाजी : नादिन डी क्लार्क ४-२२, ग्रेस हॅरिस २-२२. बंगळुरू : १३.१ षटकांत २ बाद १४७ धावा (ग्रेस हॅरिस ७५, मानधना नाबाद ५४) गोलंदाजी : आशा सोभना १-२४.

## ब्रेविसच्या बॅटने डी कॉकचे शतक



**सेंच्युरियन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजचा सात विकेट्सनी पराभव केला. आफ्रिकेच्या विक्रमी विजयात क्विंटन डी कॉकने त्याच्या टी-२० कारकिर्दीतील सर्वात जलद शतक झळकावले. या विक्रमी शतकातील आणखी एक खास गोष्ट म्हणजे त्याने दुसऱ्याची बॅट घेऊन ही खास खेळी करुन दाखवली आहे.

दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसरा टी-२० सामना सेंच्युरियन येथे खेळला गेला, जिथे वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद २२१ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेसमोर २२२ धावांचे लक्ष्य ठेवण्यात आले. एडन मारक्रम व क्विंटन डीकॉकची जोडी सलामीला उतरली, पण मारक्रम लवकर झेलबाद झाला. त्यानंतर क्विंटन डीकॉक व रिकल्टन यांनी दक्षिण आफ्रिकेला विजयापर्यंत नेले.

डी कॉकने ४९ चेंडूत १० षटकार आणि सहा चौकारांसह ११५ धावा केल्या. २३४.६९ च्या स्ट्राईक रेटने खेळत डी कॉकने ४३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हे त्याच्या कारकिर्दीतील सर्वात वेगवान शतक होते.

विशेष म्हणजे डी कॉकने ही ऐतिहासिक खेळी उधारीच्या बॅटने केली. सामन्यानंतर खुद्द त्यानेच या संदर्भातील गोष्ट शेअर केली. तो म्हणाला की, सामन्याआधी माझ्याकडून मोठी चूक झाली. मी माझ्या काही बॅट्स घरीच ठेवून आलो होतो. त्यामुळे आयत्या वेळी ब्रेविसची बॅट घेऊन खेळलो.

## ऑस्ट्रेलियन ओपन : महिला एकेरीत सबालेंका-रिबाकिनामध्ये रंगणार फायनल

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आर्यना सबालेंकाने एमिरेटस् एरिनावर आपला दबदबा कायम राखत एलिना स्वितोलिनाचा पराभव केला आणि सलग चौथ्यांदा ऑस्ट्रेलियन टेनिस ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या महिला एकेरीत अंतिम फेरीत धडक मारली. त्यामुळे जेतेपदाच्या या निर्णायक सामन्यात तिच्यासमोर कझाकिस्तानच्या एलिना रिबाकिनाचे आव्हान असणार आहे.

दोन वेळची विजेती असलेल्या सबालेंकाने सामन्याच्या सुरुवातीला खेळातील चढ-उतार आणि चौथ्या गेममध्ये पंचांनी दिलेल्या 'हिंडरन्स' (अडथळा) कॉलवर मात करत स्वितोलिनाचा ६-२, ६-३ असा धुव्वा उडवला. दुसरीकडे, विम्बल्डनची माजी विजेती एलिना रिबाकिनाने अमेरिकेच्या जेसिका पेगुलाचा ६-३, ७-६ (९-७) असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. २०२३ च्या अंतिम फेरीत सबालेंकाकडून झालेल्या पराभवाचा वचपा काढण्याची संधी आता रिबाकिनाकडे असेल. विशेष म्हणजे, या स्पर्धेत खेळलेल्या सहा सामन्यांमध्ये दोघांनीही आतापर्यंत एकही सेट गमावलेला नाही.

सबालेंका आपल्या पाचव्या ग्रँडस्लॅम जेतेपदासाठी प्रयत्नशील असून, तिने सलग ११ सामने जिंकण्याचा विक्रम केला आहे. तसेच या स्पर्धेत आतापर्यंत सर्वाधिक १७२ 'विनर्स' मारण्याचा मानही तिच्याकडेच आहे. जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या रिबाकिनाची सर्व्हिस तिचे बलस्थान मानले जाते. तिने आपल्या मागील २० सामन्यांपैकी केवळ एक सामना गमावला आहे. 'हार्ड कोर्ट'वरील आकडेवारी पाहता, रिबाकिनाने सबालेंकाविरुद्ध ६-५ अशी निसटती आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षी मॅडिसन कीजविरुद्धच्या अंतिम फेरीत पराभूत झाल्यानंतर, सबालेंका यंदा ती चूक सुधारून विजेतेपद पटकावण्यासाठी महत्त्वाकांक्षी असणार आहे.

## सर्फराज खान आणखी एका संधीस पात्र –अझरुद्दीन

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडणार सर्फराज खान आता भारतीय संघात पुनरागमनाच्या प्रतीक्षेत आहे. विजय हजारे ट्रॉफीत सर्फराजने १५७, ५५ आणि ६२ धावांची दमदार खेळी केली. रणजी ट्रॉफीत हैदराबादविरुद्ध तब्बल २२७ धावांची भव्य खेळी करत सर्वांना आपली दखल घेण्यास भाग पाडले. आता टीम इंडियाचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यानेही सरफराजबाबत मोठे विधान केले आहे.

या प्रवासात सर्फराजला अनुभवी खेळाडूंचा पाठिंबाही लाभत आहे. विशेषतः माजी भारतीय कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन याने त्याला मार्गदर्शन केले. रिव्हर्स स्विंगचा सामना कसा करायचा याबाबत अझरुद्दीनने सर्फराजशी सविस्तर चर्चा केली. 'द स्पोर्टस्टार'च्या वृत्तानुसार अझरुद्दीनची भेट घेण्यासाठी सर्फराज तब्बल ४५ मिनिटे वाट पाहत उभा होता, मात्र या यशाचे श्रेय घेण्यास अझरुद्दीन याने स्पष्ट नकार दिला. शेवटी त्याने जाऊन मैदानावर खेळ केला आणि धावा केल्या. त्यामुळे संपूर्ण श्रेय त्यालाच मिळायला हवे. त्याने माझे नाव घेतले याबद्दल मी आभारी आहे, पण त्याची गरज नव्हती. तो धावा करत राहो आणि यशस्वी होवो एवढेच मला हवे आहे. त्याच्याकडून मला मिळणारी हीच सर्वोत्तम भेट असेल, असे अझरुद्दीनने सांगितले.

सर्फराजच्या खेळातील आक्रमकतेचेही अझरुद्दीनने विशेष कौतुक केले. तो उत्तम आणि आक्रमक फलंदाज आहे. सामना कधीही आपल्या बाजूने वळवण्याची क्षमता त्याच्यात आहे. गोलंदाजाने वर्चस्व गाजवलेले त्याला आवडत नाही. फलंदाज म्हणून धावा करणे अत्यावश्यक असते. चांगल्या गोलंदाजाला जर तुम्ही वरचढ होऊ दिले, तर अडचण येते. खेळपट्टी कशी होती, हे मला माहीत नाही, पण चेंडू स्विंग होत होता आणि उसळीही अनिश्चित होती. अशा परिस्थितीत चांगल्या गतीने धावा करणे त्याच्या गुणवत्तेचेच द्योतक आहे, असे तो म्हणाला.




सर्फराजचा आंतरराष्ट्रीय प्रवासही आशादायी ठरला आहे. अनेक अडथळ्यांनंतरही त्याची मानसिकता अझरुद्दीनला सर्वाधिक भावली आहे. तो अजूनही शिकण्यास उत्सुक आहे. भारताकडून खेळून आणि धावा करूनही त्याला अधिक सुधारायचे आहे ही अतिशय सकारात्मक बाब आहे. कोणीही परिपूर्ण नसतो. मी अडचणीत असताना झहीर अब्बास यांनी मला काय बदल करायचे आणि कसे हे दाखवून दिले होते. वेगवान आणि स्विंग गोलंदाजी कशी खेळायची हे त्यांनी मला शिकवले, असे अझरुद्दीनने सांगितले.

अझरुद्दीन याने अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीकडे थेट आवाहन करत सर्फराजला आणखी एक संधी देण्याची मागणी केली. तो भारताकडून पुन्हा खेळण्याच्या संधीस पात्र आहे. त्याने सर्वत्र धावा केल्या आहेत आणि भारताला आक्रमक फलंदाजांची गरज आहे. धावा करूनही जर संधी मिळत नसेल, तर ते खूप निराशाजनक ठरते. मात्र मला खात्री आहे की, त्याला लवकरच संधी मिळेल, असे अझर म्हणाला.

## विराट कोहलीचे इन्स्टाग्राम अकाउंट अचानक बंद; काही वेळाने पूर्ववत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार क्रिकेटर विराट कोहली याचे इन्स्टाग्राम अकाउंट शुक्रवारी (दि. ३०) अचानक बंद झाले होते. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली. हे अचानक कसे घडले, याचा सर्वांनाच प्रश्न पडला होता, पण अखेर काही तासांनंतर अचानक विराट कोहलीचे अकाउंट इन्स्टाग्रामवर पुन्हा दिसू लागले.



विराट कोहली याचे अधिकृत इंस्टाग्राम अकाउंट शुक्रवारी सकाळी अचानक बंद झाले. जेव्हा चाहत्यांनी त्याचे अकाउंट शोधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना This page isn't available असा मेसेज दिसला. २७४ मिलियनहून अधिक फॉलोअर्स असलेल्या विराटचे अकाउंट अचानक दिसेनासे झाल्यामुळे जगभरातील चाहते गोंधळून गेले तसेच हे चाहते विराटची पत्नी अनुष्का शर्मा हिच्याकडे याबाबत उत्तर मागताना दिसले.

विराटने स्वतःहून अकाउंट डीएक्टिव्हेट केले, की हे एखाद्या तांत्रिक बिघाडामुळे किंवा हॅकिंगमुळे झाले याबद्दल काहीच अधिकृत माहिती मिळाली नाही. आश्चर्याची आणि धक्कादायक बाब म्हणजे विराटचा भाऊ विकास कोहली याचेही इंस्टाग्राम अकाउंट त्याच सुमारास बंद झाल्याचे चाहत्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे या प्रकरणाबाबत गूढ वाढले होते, पण त्यानंतर काही वेळातच सर्व इन्स्टाग्राम अकाउंट पुन्हा दिसू लागली.

विराट कोहलीच्या इंस्टाग्रामवर परतण्याने त्याच्या चाहत्यांना दिलासा मिळाला. इंस्टाग्रामवर त्याचे २७४ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. त्याच्या परतण्याने त्या सगळ्यांना नक्कीच आनंद झाला. दरम्यान, हे कशामुळे घडले होते याची अधिकृत माहिती अद्याप देण्यात आलेली नाही.

## रायगडच्या दोन पॉवरलिफ्टिंग खेळाडूंना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिनी विविध खेळात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य जिल्हा स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

रायगडचे क्रीडा अधिकारी प्रकाश चंद्रकांत वाघ हे नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यासाठी त्यांना त्यांचे सहकारी अंकिता मयेकर (तालुका क्रीडा अधिकारी) देविदास पाटील आणि संदीप गुरव (सहाय्यक क्रीडा विकास अधिकारी), निळकंठ आखाडे (क्रीडा मार्गदर्शक)सुचिता ढमाले (क्रीडा अधिकारी) यांचे सहकार्य असते.



कार्यक्रमात वर्ष २०२२-२३, २३-२४ आणि २४-२५ साठी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक आणि दिव्यांग खेळाडू यांना पुरस्कारांनी सन्मानित केले गेले. यात २०२२-२३चा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार पॉवरलिफ्टिंगसाठी सलोनी पद्माकर मोरे (महाड) आणि २३-२४चा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अमृता ज्ञानेश्वर भगत (शेलू वांगणी) या खेळाडूंना देण्यात आला.

सलोनीला प्रा. नवनाथ गायकर (सध्या ठाणे जिल्हा) आणि अमृताला विक्रांत गायकवाड (खोपोली) यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यापूर्वी २०१९-२०मध्ये प्रतीक्षा बबन गायकवाडला पॉवरलिफ्टिंगचा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार मिळाला होता. तिलासुद्धा प्रा. गायकर यांनी प्रशिक्षण दिले होते.

ताज्या पुरस्कारांबाबत पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोशिएयन आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई यांनी आनंद व्यक्त केला असून संबंधित खेळाडू, प्रशिक्षक यांचे कौतुक करीत पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत, तर जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांचे पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने आभार व्यक्त केले आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com